दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ५ वे अंक –१८७ गुरुवार,दि.१३ मार्च २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-187 | Thursday, Dt.13 March 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# मीडिया मॉनिटरिंग खासगी संस्थेकडे देण्याचा निर्णय सरकारने मागे घ्यावा

## मागणीसाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा बीडच्या वतीने जिल्हाधिकारी यांना पेन भेट देवून लेखणी बंद आंदोलन संपन्न






बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र सरकारने वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे आणि डिजिटल माध्यमांवरील बातम्यांचे संकलन व विश्लेषण करण्याचे काम मीडिया मॉनिटरिंग खासगी संस्थेला देण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय पत्रकारितेच्या मूलभूत तत्त्वांना आणि लोकशाही मूल्यांना बाधा आणणारा असून, माध्यम स्वातंत्र्यावर गंभीर आघात करणारा आहे. हा निर्णय सरकारने मागे घ्यावा असे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. त्यांना प्रतिकात्मक स्वरूपात पेन देऊन लेखणी बंद आंदोलन पत्रकारांनी केले. यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय बाहेर सरकारच्या विरोधात निदर्शने करून न्याय हक्काची मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा बीडच्या वतीने करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संघटक संजय भोकरे साहेब, राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे, राज्य समन्वयक नितीन शिंदे, प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमानी सर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे साहेब यांच्या संकल्पनेनुसार पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत सरकारला जिल्हाधिकारी यांच्या मार्फत बीड जिल्हा शाखेच्या वतीने मीडिया मॉनिटरिंग खाजगी संस्थेकडे देण्याचा निर्णय सरकारने मागे घ्यावा अशा आशयाचे निवेदन देण्यात आले. या निवेदनात पुढे म्हटले आहे की, पत्रकारितेचा मुख्य हेतू जनतेपर्यंत सत्य व वस्तुनिष्ठ माहिती पोहोचवणे हा आहे.मात्र, सरकारकडून या कामासाठी खासगी संस्था नेमण्याचा निर्णय घेतल्याने बातम्यांवर अप्रत्यक्ष सेन्सॉरशिप लादली जाण्याचा धोका आहे. हा निर्णय सरकारविरोधी मतप्रवाह दडपण्याचा आणि प्रसारमाध्यमांवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे दिसते.देशाच्या लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी आणि पत्रकारितेच्या स्वतंत्र भूमिकेचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई या निर्णयाला तीव्र विरोध करत आहे. सरकारने पारदर्शकता न ठेवता खासगी संस्थेला हे काम सोपवणे म्हणजे माध्यमांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रयत्न आहे. सरकार कडून लादली गेलेली ही अघोषित आणीबाणी त्वरित मागे घ्यावी असे निवेदन बीडचे जिल्हाधिकारी श्री अविनाश पाठक यांना महाराष्ट्राचे संवेदशील आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते स्व. यशवंतराव चव्हाण (मा. मुख्यमंत्री) यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून बुधवार दिनांक १२ मार्च रोजी सकाळी ११.३० वाजता देण्यात

(उर्वरीत पान २ वर)

### जिल्हाधिकारी यांच्यासमोर लेखणी बंद आंदोलन

महाराष्ट्र राज्याचे पहिले माजी मुख्यमंत्री संवेदनशील आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीचे औचित्य साधून बुधवार दिनांक १२ मार्च २०२५ रोजी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक साहेब यांना प्रतीकात्मक स्वरूपात पेन भेट देऊन पत्रकारांनी आपले अनोखे लेखणी बंद आंदोलन केले.

### जिल्हाधिकाऱ्यांची गोड ऑफर – पत्रकारांचा गोंधळ आणि हास्याचा फवारा!

बीड (प्रतिनिधी)

पत्रकार आपली मागण्या घेऊन जिल्हाधिकाऱ्यांच्या कक्षात पोहोचले, सरकारविरोधातील तक्रारींची यादी हाती होती, चेहऱ्यावर थोडेसे तणावाचे भाव होते. पण कोणालाही कल्पना नव्हती की जिल्हाधिकारी साहेब आज वेगळ्याच मूडमध्ये आहेत!पत्रकारांनी पहिला प्रश्न टाकणार तोच साहेबांनी पुढे सरसावत पेढ्यांचा डबा उघडला आणि मिश्कील हसत म्हणाले, सर्वप्रथम पेढे संपवा, मग बोलू! काही क्षणांसाठी संपूर्ण खोलीत स्तब्धता पसरली. पत्रकार एकमेकांकडे पाहू लागले – हे काय नवीन? सरकारवर रोज टीका करणाऱ्या पत्रकारांना जिल्हाधिकाऱ्यांची ही गोड ऑफर काही केल्या पचनी पडत नव्हती!

पण थोड्याच वेळात कुणीतरी पहिला पेढा उचलला, मग दुसऱ्याने, आणि मग तर जणू स्पर्धाच लागली! काहींनी मिश्कीलपणे विचारले, आज काही खास आहे का, साहेब? यावर जिल्हाधिकारी साहेब गोड हसत म्हणाले, विशेष काही नाही, पण वातावरण हलकं असलं की संवाद अधिक चांगला होतो!

क्षणभर आधी तणावग्रस्त वाटणारे पत्रकारही या गोडसर वाक्याने खुलले. विषय गंभीर असला तरी चर्चा आता अधिक सौहार्दपूर्ण झाली. जिल्हाधिकाऱ्यांच्या या मिस्कील शैलीने सर्वांनाच वेगळाच आनंद दिला. शेवटी, केवळ प्रश्न विचारण्यापुरते नाही, तर असे हलकेफुलके क्षणही पत्रकारितेचा एक भाग असतात!

## दहा ते बारा कोटीत आमदार झालो असल्याच्या आ.प्रकाश सोळंकेच्या कबुलीने खळबळ

### निवडणूक आयोगाची दहा ते बारा कोटी रुपये खर्चाची परवानगी आहे का?




वडवणी/प्रतिनिधी

निवडणूक आयोगाने राज्याच्या विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांनी एकूण किती खर्च करावा ही मर्यादा दिली आहे.त्यानुसार प्रत्येक उमेदवाराला आपल्या प्रचारासाठी ४० लाख रुपये खर्च करावे लागणार आहे. त्यामुळे आता विधानसभा निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराला ४० लाखांपेक्षा जास्त पैसे वापरून प्रचार करता येणार नाही. तसेच या खर्चाचा अहवाल त्यांना निवडणूक आयोगाकडे सादर करावा लागणार आहे असे निर्देश असताना आमदार प्रकाश सोळंके यांनी मी १० ते १२ कोटी रुपयांत आमदार झालो आहे असे वडवणी येथे ग्रामीण रुग्णालयाच्या भुमिपुजन कार्यक्रमात बोलताना कबुली दिली असल्याने एकच खळबळ उडाली आहे.मग निवडणूक आयोगाने दिलेल्या मर्यादा ओलांडत खर्च केला असल्याने निवडणूक आयोग कारवाई करणार का? या कबुलीची काय दखल घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यावेळी पुढे बोलताना आ.सोळंके म्हणाले की,माजलगाव मतदार संघात निवडणूका लागल्या की कुणीही येतंय आणि निवडणुकीला उभा राहातंय त्याला आता काही मोजमाप राहिले नाही फक्त पैशाच्या मस्ती वरती निवडणुकीला उभा राहतात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. विधानसभा निवडणुकीत एका उमेदवारांनी तर ४० ते ५० कोटी रुपये खर्च केले तर दुस–या एका उमेदवारांनी ३०ते ३५ कोटी रुपये खर्च केले असे ऐकायला मिळाले मी मात्र १० ते १२ कोटीतच आमदार झालो असे आ.सोळंके यांनी आपल्या भाषणात निवडणुकीचा वृतांत सांगितला त्यामुळे ऐकणा–या उपस्थित लोकांचे कान

(उर्वरीत पान २ वर)

## डॉ.ज्ञानराज गणेश वरेकर याची एम .डी. (डरमॅटोलॉजी ) साठी निवड झाल्याबद्दल सत्कार संपन्न

बीड /प्रतिनिधी

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे बीड जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांचे सुपुत्र चि.डॉ. ज्ञानराज वरेकर याने पुणे येथील डी.वाय . पाटील कॉलेज मध्ये एम.बी.बी.एस. करुन त्याचा राजस्थानमधील उदयपुर येथील पॅसिफिक कॉलेजला त्वचारोग तज्ञ (डरमॅटोलॉजी) एम.डी. यासाठी

(उर्वरीत पान २ वर)




## ना.अजितदादा पालकमंत्री असल्यामुळे पाच वर्षात बीड जिल्ह्याचा बारामतीसारखा विकास होईल

### आ.संदीप क्षीरसागरांनी व्यक्त केली जिल्हावासीयांकडून अपेक्षा
### बीड मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडले




मुंबई ।प्रतिनिधी

यावेळेस ना.अजितदादा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असल्यामुळे पाच वर्षांमध्ये बीड जिल्ह्याचा विकास बारामतीसारखा होईल. अशी अपेक्षा संपूर्ण जिल्ह्यावासीयांकडून आ.संदीप क्षीरसागरांनी व्यक्त केली. विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड मतदारसंघाच्या विकासासाठी अत्यावश्यक असलेले विविध प्रश्न सभागृहात मांडले.

मुंबई येथे महाराष्ट्र विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरू आहे. या अधिवेशनात आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.१२) रोजी बीड मतदारसंघाच्या विकासासाठी अत्यावश्यक असलेले विविध प्रश्न व कामे सभागृहात मांडली. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यावेळेस ना.अजित दादा पवार आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्याला ना.अजितदादांकडून अपेक्षा आहेत. ना.अजितदादांच्या पुढाकारातून येत्या पाच वर्षांत बीड जिल्ह्याचा विकास बारामतीसारखा होईल अशी लोकभावना जिल्हावासीयांची आहे. अशा शब्दांत आ.क्षीरसागरांनी ना.अजितदादांकडे जिल्ह्याच्या विकासाबाबत अपेक्षा व्यक्त केली.

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी हद्दपार करायची असेल तर, तरूणांना रोजगार देऊन गुन्हेगारी पासून परावृत्त करावे लागेल. त्यासाठी बीड येथे असलेल्या एमआयडीसीचा विकास होणे गरजेचे आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागरांचा ना.अजित पवारांकडे पाठपुरावा सुरू आहे. मागील काही दिवसांपूर्वीच बीड एमआयडीसीचा प्रस्ताव घेऊन आ.संदीप क्षीरसागर ना.अजितदादांना भेटले होते. त्यावर ना.अजितदादांनी विभागाला निर्देश दिले होते. त्यानंतर बीड येथे उपलब्ध असलेल्या २५० एकर जागेचा सर्वे काही दिवसांपूर्वीच झाला आहे. औद्योगिक वसाहतीसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबी येथे उपलब्ध आहेत. तसेच मोठ्या उद्योजकांनाही भेटलो असून त्यांनीही याठिकाणी उद्योग उभारण्यासाठी तयारी दर्शवली आहे. त्यामुळे बीड एमआयडीसीच्या विकासासाठी निधी देऊन बळ द्यावे अशी मागणी आ.संदीप क्षीरसागरांनी केली. यासोबतच बीड शहरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी विशेष बाब म्हणून नगरपालिकेकडील वीजबिल भरण्यासाठी निधीची तरतूद करावी त्यामुळे या उन्हाळ्यात खूप मोठा दिलासा बीड शहरातील नागरिकांना मिळेल. टुकूर साठवण तलाव प्रकल्पात सन २००३ मध्येच कार्यारंभ आदेश मिळालेले आहेत परंतु याला असलेल्या स्थानिकांच्या विरोध असल्यामुळे हे काम होऊ शकले नाही. त्यावर मार्ग काढून एकाच ठिकाणी साठवण तलाव करण्याऐवजी चार विविध ठिकाणी बंधारे केल्यास तलावाइतक्याच क्षमतेने पाणी साठवणूक होईल. आणि हे सर्व तलाव प्रकल्पाला लागणार्या रकमेच्या अर्ध्याच रकमेत होणारा प्रकल्प आहे. त्यामुळे या महत्त्वाच्या प्रकल्पाला निधी द्यावा. तसेच शिरूर कासार तालुक्यातील फुलसांगवी येथील २.८३ द.ल.घ.मी. क्षमतेचा साठवण तलाव आहे. परंतु पावसाळ्यातील बदलामुळे तलाव भरण्यासाठी अडचण निर्माण होते. त्यामुळे येथीलच सिंदफणा नदीवर मोठ्या क्षमतेचा बंधारा तयार केल्यास किंवा इतर पर्यायी उपयुक्त मार्गाचा अवलंब करून उपसा जलसिंचन किंवा कॅनॉलद्वारे पाणी तलावात सोडल्यास

(उर्वरीत पान २ वर)



## निश्चय नैसर्गिक रंगाच्या होळीचा...! संकल्प वसुंधरेच्या रक्षणाचा...!

### पर्यावरण मंत्री पंकजा मुंडेंनी दिल्या
### मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना पर्यावरणस्नेही होळीच्या शुभेच्छा

मुंबई ।प्रतिनिधी

होळी व धुलीवंदना निमित्त सर्वांनी पर्यावरणपूरक होळी साजरी करावी या उपक्रमाच्या अनुषंगाने आज पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पर्यावरणपूरक पाच रंगाचा समावेश असलेले पॅकेट देऊन पर्यावरणस्नेही होळी साजरी करण्याच्या शुभेच्छा दिल्या.

होळी व धुलीवंदन तसेच रंगपंचमी हा

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# होय... मराठीच!

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भैयाजी जोशी यांनी, 'मुंबईची एक अशी भाषा नाही... घाटकोपरची भाषा गुजराती आहे... मुंबईत येणाऱ्या प्रत्येकाला मराठी बोलता यायलाच हवे, असे नाही' अशी वक्तव्ये केल्याने संताप उसळला.

या ओळी कवी माधव ज्युलियन यांच्या. माधव ज्युलियन यांनी इहलोकाची यात्रा संपवूनही आता ८५ वर्षे झाली. या ८५ वर्षांच्या काळात आपला देश स्वतंत्र झाला. पुढे देशात भाषावार प्रांतरचना झाली. १ मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्राची स्थापना झाली आणि मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा झाली. मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा झाल्यानंतर महाराष्ट्राचे चालणे, बोलणे, व्यवहार करणे, अभिव्यक्ती या आणि अशा तमाम गोष्टी मराठीत होणे अपेक्षित होते. सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे मराठीला निर्विवाद प्रतिष्ठा मिळणे गरजेचे होते. प्रत्यक्षात हे झाले का, असा प्रश्न कोट्यवधी मराठी जनांना वारंवार पडतो.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भैयाजी जोशी यांनी, 'मुंबईची एक अशी भाषा नाही... घाटकोपरची भाषा गुजराती आहे... मुंबईत येणाऱ्या प्रत्येकाला मराठी बोलता यायलाच हवे, असे नाही' अशी वक्तव्ये केल्याने संताप उसळला. त्यानंतर जोशी यांनी त्यावर पडदा टाकण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. शिवाय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, 'मुंबईची-महाराष्ट्राची भाषा मराठीच आहे', असे निःसंदिग्ध विधान केलेले आहे. रा. स्व. संघ ही भारतीय जनता पक्षाची मातृसंस्था असल्याने फडणवीस यांचे वक्तव्य महत्त्वाचे. अर्थात, हे खुलासे झाले असले तरी काही बाबी उरतातच व त्या ऐरणीवर आणणे आवश्यक ठरते.

पहिली बाब. मुंबईची - मग ते घाटकोपर असो... गिरगाव असो... दादर असो... कुर्ला असो... अंधेरी असो... विलेपार्ले असो... मुलुंड असो किंवा अन्य कुठलेही शहर वा उपनगर - भाषा मराठीच आहे, हे सगळ्यांनी मेंदूवर, मनावर कोरून ठेवलेले बरे. त्यातील 'च' महत्त्वाचा. आणि उभ्या आडव्या पसरलेल्या महाराष्ट्राची भाषाही मराठीच आहे. महानगर, राज्याची व देशाची आर्थिक राजधानी म्हणून मुंबईच्या पदरात जसे काही घसघशीत फायदे पडले आहेत, तसे तोटेही.

आर्थिक चलनवलनाचे एक जागतिक केंद्र असल्याने संधींची अमर्याद उपलब्धता हा त्यातील ठळक फायदा. तर बहुभाषिक, बहुसांस्कृतिक रचनेमुळे मूळ मराठी संस्कृती व भाषेचा आक्रसणारा परीघ हा त्याचा मोठा तोटा. हे फायदे मिळालेला मुंबईतील मराठी माणूस तदअनुषंगिक तोट्यांशी झगडतो आहे, हे वास्तव. मात्र, तरीही भाषेसारख्या मुद्द्यावर मराठी माणसाचा मानभंग होईल, अशी वक्तव्ये करणे, तशा कृती होणे हे सर्वस्वी अस्वीकारार्हच. कारण मातृभाषेचा मुद्दा हा केवळ भावनिक नाही. त्याला रोजच्या जगण्यातील व्यवहारांची जोड आहे. भावना व व्यवहार यांचे ते अजब रसायन. त्यामुळे निव्वळ भावनिक मुद्दे हे जसे एकवेळ दुर्लक्षित करता येऊ शकतात, तसा हा मुद्दा दुर्लक्षित करता येण्याजोगा नाही व तो करूही नये. आजचा काळ हा टोकदार अस्मितांचा आहे आणि त्यावरील प्रच्छन्न राजकारणाचाही आहे. अशा वेळी आपली अनावश्यक, अतार्किक, अप्रस्तुत वक्तव्ये वादंग उभा करू शकतात, याचे भान सूज्ञांनी बाळगायला हवे.

आणि आता मुंबईतील आणि एकूणच मराठी माणसाविषयी. 'दक्षिण भारतात जाऊन, तेथील भाषांविरोधात वक्तव्ये करण्यास असे कुणी धजेल का?' असा प्रश्न संतापलेला मराठी माणूस हमखास विचारतो. तर त्याचे निःसंदिग्ध उत्तर 'नाही' हेच. दाक्षिणात्य राज्यांतील स्थानिक मंडळींनी त्यांच्या राजधान्यांसकट पूर्ण राज्यांमध्ये भाषांबाबतचा अभिमान कायम कमालीचा जागता ठेवलेला आहे. तशा वातावरणात त्या भाषांबाबत काही अनुचित बोलण्यास कोण धजावणार? त्या तुलनेत आपले वर्तन कसे असते, हा प्रश्न प्रत्येक मराठी माणसाने स्वतःला विचारायला हवा. मुंबईवर मराठी माणसाची राजकीय सत्ता असली तरी त्या अर्थाने आर्थिक सत्तेवर त्याची फारशी मांड नाही, हे कटू असले तरी सत्य. राजकीय पातळीवरही, खऱ्या आणि चांगल्या अर्थाने प्रादेशिक अस्मिता बाळगणारा शक्तिशाली राजकीय पक्ष दिसत नाही.

मराठी मतदार अनेक पक्षांत विभागला गेल्याने त्या अर्थाने त्याचे जोरकस असे अस्तित्व दिसत नाही. अशा विचित्र वातावरणात मराठी माणसाचा आवाजच क्षीण झाला आहे की काय, अशी शंका यावी. हे चित्र बदलणे फक्त आणि फक्त मराठी माणसाच्याच हाती आहे. मनात भाषिक न्यूनगंड असेल तर तो दूर फेकून, मातृभाषेचा मुद्दा प्राधान्ययादीत ठेवून त्याने मराठीसाठी सदैव जागते राहायला हवे. इतिहासाचे नाव काढल्यावर मुठी आवळून घोषणा देणे सोपे; वर्तमानातील आव्हानांना सामोरे जाणे कठीण. या कठीणाशी मराठी माणसाने दोन हात करायला हवेत... भविष्यासाठी.

# सरकारी मीडिया मॉनिटेरिंग खाजगी संस्थेकडे देण्याचा महाराष्ट्र सरकारच्या निर्णयाला पत्रकार संघाचा विरोध

## डिजिटल मिडिया बीड जिल्हा व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई शाखा गेवराई च्या वतीने निवेदन देवून लेखणी बंद आंदोलन

गेवराई /प्रतिनिधी

महाराष्ट्र सरकारने वृत्त वाहिन्या वृत्तपत्रे आणि डिजिटल माध्यमातून संकलन व विश्लेषण करण्याचे काम खाजगी संस्थेला देण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय पत्रकारितेच्या मूलभूत तत्त्वांना आणि लोकशाही मूल्यांना बाधा आणणारा असून माध्यमस्वातंत्र्यावर गंभीर आघात करणारा आहे.पत्रकारितेचा मुख्य हेतू जनतेपर्यंत सत्य व वस्तुनिष्ठ माहिती पोहोंचवणे हा आहे.मात्र सरकारकडून या कामा साठी खाजगी संस्था निर्णयाचा निर्णय घेतल्याने बातम्यावर अप्रत्यक्ष सेन्सॉरशीप लादली जाण्याचा धोका आहे. हा निर्णय सरकार विरोधी मतप्रवाह दडपण्याचा आणि प्रसार माध्यमावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे दिसते.देशाच्या लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी आणि पत्रकारितेच्या स्वतंत्र भूमिकेचे संरक्षण करण्या साठी आम्ही डिजिटल मिडिया व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई,शाखा गेवराई च्या वतीने या निर्णयाला तीव्र विरोध करत आहोत.

सरकारने पारदर्शकता न ठेवता खाजगी संस्थेला हे काम सोपवणे म्हणजेच माध्यमावर नियंत्रण ठेवण्याचा प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष प्रयत्न आहे. सरकारकडून



लादलेली गेलेली ही अघोषित आणीबाणी त्वरित मागे न घेतल्यास आम्ही आज दिनांक १२ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्राचे संवेदन शील आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते स्व. यशवंतराव चव्हाण माजी मुख्यमंत्री यांच्या जयंती दिवशी राज्यव्यापी लेखणीबंद आंदोलन व निदर्शने केले आहेत. ही बाब पुरोगामी महाराष्ट्रात घडू नये असे आम्हाला वाटते.यासाठी आमच्या मागण्यांचा जाणीवपूर्वक विचार करून राज्य सरकारने खाजगी संस्थेमार्फत मिडिया मॉनिटरींग करण्याचा निर्णय त्वरित मागे घ्यावा.यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संघटक मा.संजय भोकरे,राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे,प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे, राज्य समन्वयक नितीन शिंदे,प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमानी प्रदेश संपर्कप्रमुख वैभव विवेक स्वामी , डिजिटल मिडिया प्रदेशाध्यक्ष सिध्दार्थ भोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली डिजिटल मिडिया बीड जिल्हा व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई शाखा गेवराई वतीने तहसीलदार यांना निवेदन देत लेखणी बंद आंदोलन करत सरकार विरोधात घोषणा देण्यात आल्या. यावेळी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अंकुश आतकरे, विभागीय उपाध्यक्ष सुनील पोपळे, डिजिटल मिडिया जिल्हाध्यक्ष अनिल आगुंडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई बीड जिल्हा कार्याध्यक्ष अमोल कापसे, जिल्हा उपाध्यक्ष बापू गाडेकर, शेख सलमान, उपाध्यक्ष भागवत देशपांडे, राजेंद्र नाटकर, सचिव तुळशीराम वाघमारे, विष्णू राठोड, सतिष वाघमारे, कैलास हादगुले, ज्ञानेश्वर जाधव, अरविंद कुलकर्णी यांच्या सह पदाधिकारी उपस्थित होते

# कंडारी खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत उत्साहात पार पडले ६ वे वार्षिक स्नेह संमेलन

बदनापूर ।प्रतिनिधी

तालुक्यातील कंडारी खुर्द येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात आणि आनंदात पार पडले.मागील सहा वर्षांपासून सुरू असलेल्या वार्षिक स्नेहसंमेलना मध्ये याही वर्षी चिमुकल्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.या वार्षिक स्नेहसंमेलनाला सर्व कंडारी खुर्द येथील नागरिक उपस्थित होते. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अण्णासाहेब जायभाय,मुख्याध्यापक राऊत सर सहशिक्षक काचे सर, डांगे मॅडम,फटाले सर,चाटे सर,ब्रह्मदेव ढाकणे,शिवहरी ढाकणे,ज्ञानेश्वर ढाकणे,संजय शिंदे,सोपान ढाकणे,यांच्यासह देवा ढाकणे तरुण



मित्र मंडळाचे या ठिकाणी सहकार्य लाभले.जवळपास ४ तास चाललेल्या या वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कंडारी खुर्द येथील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते समाज सुधारकांची गीते त्याचबरोबर मराठी आणि इंग्रजी शाळा मधले वास्तव आणि वस्तुस्थिती यावर काही नाटिका सादर केल्या. यावेळी गावकऱ्यांकडून या विद्यार्थ्यांचं मोठं कौतुक करण्यात आलं आणि त्यांना बक्षीसही देऊन त्यांचा आनंद द्विगुणीत करण्यात आला दरम्यान यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या माजी विद्यार्थिनी आणि आभार प्रदर्शन काकासाहेब ढाकणे यांनी केलं.

# माजी सैनिक अशोक गिरी यांच्या हस्ते पुरस्कार प्राप्त पत्रकारांचा सत्कार

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर शहरातील माजी सैनिक अशोक गिरी यांच्या निवासस्थानी तालुक्यातील पुरस्कार प्राप्त पत्रकारांच्या सत्काराचा कार्यक्रम मंगळवारी संपन्न झाला.या वेळी ज्येष्ठ नगरसेवक अर्जुन दादा गाडेकर यांच्यासह प्रतिष्ठीत व्यापारी प्रताप रणखांब, ज्योती क्रांती मल्टिस्टेटचे शाखाधिकारी अमोल रणखांब,सर्पमित्र महेश औसरमल,पत्रकार भारत पानसंबळ,प्रमोद निकम,महात्मा फुले युवा दलाचे अशोक कातखडे,युवा नेते प्रताप कातखडे,आदर्श शिक्षक नितीन गाडेकर वाहक प्रमोद अंदुरे, प्रतिष्ठीत व्यापारी प्रकाश भांडेकर,माधव भांडेकर यांची




उपस्थिती होती.उदगीर तालुका पत्रकार संघाच्या वतीने उत्कृष्ट वार्ता आणि शाश्वत विकास वार्ता हे दोन पुरस्कार मिळाल्याबद्दल पत्रकार गोकुळ पवार यांच्यासह गंगाई बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार मिळाल्याबद्दल ज्येष्ठ पत्रकार विजयकुमार गाडेकर आणि गंगाई बाबाजी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल शहादेव मुळे यांचा शाल,श्रीफळ आणि पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला.गिरी परिवाराच्या वतीने पुरस्कार प्राप्त पत्रकारांचा सत्कार झाल्यानंतर अल्पोहाराचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन गाडेकर यांनी तर आभार प्रदर्शन पत्रकार भारत पानसंबळ यांनी केले.

# उन्हाळ्यात गारवा हवाय, मग वीजबील भराच

## मार्च अखेर १६८ कोटी वसुलीचे आव्हान, ५३६ वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत

त्वरीत वीजबील भरण्याची महावितरणची साद

बीड ।प्रतिनिधी

महावितरणने मार्च महिन्याची व थकीत वीजबिलांची वसुली मोहीम हाती घेतली असून उन्हाची तिव्रताही दिवसेंदिवस वाढत आहे. मार्चच्या रखरखत्या उन्हाळयात गारवा हवा असेल तर वीजग्राहकांनी आपले थकीत वीजबील त्वरीत भरावे अशी आर्त हाक महावितरणने जिल्हयातील वीजग्राहकांना घातली आहे. गेल्या ११ दिवसात ३४ टक्केच वसुली झाल्याने उर्वरीत वीस दिवसात महावितरणला १५७ कोटी ७ लाख रूपयांची थकबाकी वसुली करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागणार आहे. त्यामुळे वीजग्राहकांनी आपल्या थकीत बीजबीलांचा भरणा करून सहकार्य करावे अन्यथा नाईलाजास्तव वीजपुरवठा खंडीत करण्याची कारवाई करावी लागेल असे आवाहन महावितरणने केले आहे.

महावितरणच्या बीड मंडळासाठी वरिष्ठ कार्यालयाने लघूदाब वर्गवारीतील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांकडील वीजबील वसुलीसाठी मार्च महिन्याचे चालू बिलाचे ३२ कोटी ५ लाख व थकबाकीचे १३६ कोटी ४ लाख असे एकत्रीत १६८ कोटी ८ लाख रूपयांचे लक्ष्य निर्धारीत केले आहे. या लक्ष्याचा पाठलाग करत मागील ११ दिवसात केवळ ११ कोटी १ लाख रूपयांची वीजबील वसुली झालेली आहे. हे प्रमाण खूपच कमी असून येणाऱ्या २० दिवसात उर्वरीत १५७ कोटी ७ लाख रूपयांची वसुली होणे महावितरणसाठी तारेवरची कसरत ठरणार आहे. वसुलीसाठी मंडळातील सर्व अधिकारी, कर्मचारी दारोदार फीरत आहेत, मात्र जिल्हयातील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वर्गवारीतील वीजग्राहकांकडून फारसा सकारात्मक प्रतिसाद मिळताना दिसत नाही. त्यामुळे भर उन्हाळयात वीजपुरवठा खंडीत करण्याशिवाय महावितरणसमोर दुसरा पर्याय उरलेला नाही. वीजबील न भरल्यामुळे गेल्या ११ दिवसात ४९५ वीजग्राहकांचा तात्पुरत्या स्वरूपात वीजपुरवठा खंडीत करण्यात आला आहे तर ४५ वीजग्राहकांचा कायमस्वरूपी वीजपुरवठा



खंडीत करण्यात आला आहे.

बीड मंडळा अंतर्गत येणाऱ्या लघुदाब वर्गवारीतील १ लाख २७ हजार १७३ घरगुती ग्राहकांकडे ११५ कोटी ४८ लाख थकीत आहेत. व्यावसायिक वर्गवारीतील १० हजार ४९४ वीजग्राहकांकडे १० कोटी ६९ लाखांची थकबाकी आहे. तर औद्योगिक वर्गवारीतील २ हजार ८०० ग्राहकांकडे २१ कोटी ८४ लाख थकीत असून, इतर वर्गवारीत मोडणाऱ्या ग्राहकांकडे ६ कोटी ७ लाख रूपयांची थकबाकी आहे. काल पर्यंत झालेल्या वसुली मोहिमेत ११ कोटी १ लाख रूपयांची वसुली झालेली आहे. येणाऱ्या दिवसातील सार्वजनिक सुट्ट्यांचा कालावधी पाहता जास्तीत जास्त वसुली होण्याकरिता महावितरणची सर्व वीजबील भरणा केंद्र सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे वीजग्राहकांनी त्वरीत वीजबीलाचा भरणा करावा असे आवाहन महावितरणने केले आहे.

पान १ वरून..

**मीडिया मॉनिटरिंग..**

आले.यावेळी सरकारने जर निर्णय मागे घेतला नाही तर मुंबई मंत्रालयासमोर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई तर्फे राज्यव्यापी आंदोलन करण्याचा इशारा ज्येष्ठ संपादक शेखर कुमार, बीड जिल्हा शाखेचे जिल्हाध्यक्ष अमजद खान पठाण, जिल्हा सचिव शेख वसीम, पत्रकार हल्ला विरोधी समितीचे जिल्हाध्यक्ष शेख ताहेर, जिल्हा सचिव शेख अब्दुल, महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा, महिला जिल्हा सचिव प्रा. अनुप्रिता मोरे,जिल्हा संघटक रईस खान, जगन्नाथ परजणे,उपाध्यक्ष शेख वसीम, संपर्क प्रमुख नितेश उपाध्ये, शहराध्यक्ष सचिन बोबडे, शहर उपाध्यक्ष बाळासाहेब कांबळे, प्रसिद्धीप्रमुख लक्ष्मण गायकवाड,नंदा भंडारी, आरती कोरडे, किशोर सोनवणे, अमोल अहिरे,अँड. नितीन पवार, ज्योती तूसांबड, दत्ता काटे यांच्यासह बीड जिल्हा कार्यकारणी वरील प्रमुख पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरील निवेदनाची प्रतिलिपी बीड येथील जिल्हा माहिती कार्यालयामध्ये पत्रकार संघाचे वतीने देण्यात आली.

**दहा ते बारा कोटीत..**

टवकारले होते. त्यामुळे बसलेल्या जनतेत चांगलीच कुजबुज सुरू झाली होती विधानसभा निवडणुकीत एका उमेदवाराला निवडणूक खर्चासाठी निवडणूक आयोगाने ४०लाखाची मर्यादा दिली आहे मग १० ते १२ कोटी रुपये खर्चाची परवानगी आमदार सोळंके यांना कोणी दिली आहे. ?दहा ते बारा कोटीत आमदार झालो असल्याच्या आ.प्रकाश सोळंकेच्या कबुलीने वडवणी तालुक्यासह माजलगाव मतदार संघात खळबळ उडाली असून या वक्तव्यामुळे आ.प्रकाश सोळंके यांच्यावर निवडणूक आयोग काय कारवाई करणार असा प्रश्न उपस्थित होतो.

विधानसभा निवडणुकीसाठी ४०लाखाची खर्चाची मर्यादा

या अगोदर विधानसभा निवडणुकीसाठी २८ लाख रुपये खर्च करण्याची मर्यादा होती परंतु यावेळी ४० लाखाची मर्यादा करून १२लाख रुपयांची वाढ करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाकडून विधानसभा निवडणूक लढविताना उमेदवाराने प्रचारासाठी किती खर्च करावा यासाठी मर्यादा घालण्यात आल्या होत्या. प्रत्येक उमेदवाराला फक्त ४० लाख रुपये खर्च करण्याचे निर्देश आयोगाने जारी केले होते. आयोगाने त्यासंदर्भात दरपत्रक सुध्दा काढले होते यामध्ये चहा, नाष्टा, जेवण, गाडी खर्चासोबत व्हीआयपीसाठी देण्यात येणाऱ्या बुके याचा देखील समावेश आहे. तसेच यासंदर्भात आयोगाने काटेकोरपणे नियोजनदेखील आखून दिले आहे. तसेच या आदर्श दरपत्रकानुसार खर्च करून त्याचा हिशेब प्रत्येक उमेदवाराला निवडणूक आयोगाला सादर करण्याचे निर्देश दिले होते.

पान १ वरून..

**ना.अजितदादा पालकमंत्री ...**

तलाव पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी कायमस्वरूपी मार्ग निघेल. परिणामी परिसरातील अनेक गावांच्या सिंचनाचा प्रश्न सुटेल. त्यामुळे या कामाकरिता निधी देण्यात यावा. त्यासोबतच बीड शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उंची वाढविणे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळ्याची उभारणी करणे, स्व.अण्णासाहेब पाटील व स्व.विनायकराव मेटे यांचा पुतळा पंचायत समिती आवारात बसविणे आदी कामांना निधी देण्यात यावा अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी सभागृहात केली. बीड मतदारसंघाच्या विकासासाठी अतिमहत्वाच्या असलेल्या विविध प्रस्तावित कामांना निधी आणि मंजुरी देण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली.

**डॉ.ज्ञानराज गणेश ...**

निवड झाल्याबद्दल आज शिवसेनेच्या मध्यवर्ती कार्यालयात तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या वतीने माजी आमदार सय्यद सलीम साहेब व जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व डॉ.वाघमारे साहेब यांच्या शुभहस्ते ज्ञानराजचा सत्कार करुन त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी जिल्हासहसचिव श्रीकृष्ण गायके ,किसान सेनेचे तालुका संघटक भिमराव कुटे, युवानेते मुकेश भैय्या घुमरे, सर्कलप्रमुख दत्ता सुरवसे, संतोष पाळवदे , माजी सरपंच रामनारायण जाधव ,बाबु कुटे , रत्नाकर येवले, यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते शेवटी तालुकाप्रमुख गोरख सिंघन यांनी सर्वीचे आभार व्यक्त केले.

**निश्चय नैसर्गिक....**

सण राज्यात मोठ्या प्रमाणात साजरा केले जाते. रंग खेळताना ते पर्यावरण व नैसर्गिक असावेत, यासाठी जनजागृती आवश्यक आहे. राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या वतीने पर्यावरण पूरक होळी, धुलिवंदन व रंगपंचमी साजरी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनीही पर्यावरण पूरक होळी, रंगपंचमी व धुलिवंदन साजरी करण्याचे आवाहन केले आहे. याचाच एक भाग म्हणून पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री श्रीमती मुंडे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सागर निवासस्थानी जाऊन तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांना विधानभवनात भेटून पर्यावरण पूरक रंगाचे पॅकेट देऊन शुभेच्छा दिल्या.

# जिल्ह्यातील शाळा दुपारच्या सत्रात बेकादेशीर रितीने बंद

गावकऱ्यांनो पंचनामे करा - ॲड. अजित देशमुख

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा वेगवेगळ्या कामासाठी सातत्याने गाजत असतो. प्रशासन चांगले चाललेले आहे, हे फक्त कागदावर दाखवण्यात काही अधिकारी लक्ष घालतात. मात्र प्रत्यक्षात आपल्या खाली किती अंधार आहे ? हे पाहिले जात नाही. जिल्ह्यातील अनेक शाळा दुपारच्या सत्रात एक मार्च २०२५ पासून बंद असतानाही कुठलीही कारवाई होत नाही. विद्यार्थ्यांच्या नुकसानीकडे कोण पाहणार ? असा प्रश्न उपस्थित करत प्रत्येक गावातील शालेय शिक्षण समिती, सरपंच आणि गावकऱ्यांनी बंद शाळेचे पंचनामे करून शिक्षकांवर कारवाईची मागणी करावी, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ड. अजित देशमुख यांनी केली आहे.



यासंदर्भात कुर्ला तालुका बीड येथील तुषार पाटील व अन्य गावकऱ्यांसह इतर काही गावातील लेखी व तोंडी तक्रार देखील प्रशासनाकडे पोहोचलेल्या आहेत. शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्यासह थेट मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे या तक्रारी दिलेल्या आहेत.

शिक्षणाची वाट लावणे, ही गंभीर बाब असताना वरिष्ठ अधिकारी मात्र या तक्रारीकडे गांभीर्याने पाहत नाहीत. त्यामुळे या अधिकाऱ्यांना जागेवर आणण्यासाठी प्रत्येक गावातील गावकऱ्यांनी आपापल्या परीने बंद शाळांचे पंचनामे करणे, त्याचप्रमाणे अँगल कॅम कॅमेरा मध्ये वेळ, तारीख आणि इतर सर्व माहितीसह फोटो घेऊन संबंधित शिक्षक व मुख्याध्यापकांवर कारवाई करण्याची मागणी करावी. शिक्षण हे वाघिणीचे दूध म्हटलं जातं. मात्र दहावी आणि बारावीच्या परीक्षा पाहता परीक्षेतील कॉपी मुळे शिक्षणाचा दर्जा ढासळलेला आहे. त्यातच आता शाळा बंद ठेवल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अचानक फेरफटका मारला आणि विद्यार्थ्यांची विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले तर त्यांना गुणाकार, भागाकार अशा मूलभूत क्रिया देखील येत नाहीत. त्याचप्रमाणे इंग्रजीचा आणि विद्यार्थ्यांचा अनेक ठिकाणी गंध नाही. हे देखील दिसून येईल. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा ढासळव होणार्या या दोषी शिक्षकांवर कारवाई करून त्यांचे पगार कपात करावेत, अशी मागणी ही ड. देशमुख यांनी केली आहे.

# अबॅकस मास्टर वेदिका कांता विशाल जगतापला इंटरनॅशनल अबॅकस प्रवेश परीक्षामध्ये सर्वोत्कृष्ट विजय मेडल आणि ट्रॉफी बहाल




## निवड = वेदिका कांता विशाल जगतापची जागतिक ऑनलाइन अबॅकस चॅम्पियनशिपसासाठी निवड

बीड ।प्रतिनिधी

अबॅकस म्हणजे गणितीय तंत्र असून आंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा बीड मधील विद्यार्थ्यांनी यश संपादन केलेले तसेच विद्यार्थ्यांच्या बौद्धिक आणि सर्वांगीण विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होतो. बीड मधील अबॅकस व वैदिक स्टडी केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य स्तरावर, अबॅकस आणि वैदिक चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन अबॅकस तिसऱ्या जूनियर ग्रुप लेवल परीक्षांमध्ये वेदिका कांता विशाल जगतापला जागतिक अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये भाग घेण्याची संधी मिळाली आहे. बीडच्या अबॅकस सेंटर मध्ये तीन मार्च २०२५ रोजी निकाल जाहीर झाल्याप्रमाणे सर्वोत्कृष्ट गोल्ड मेडल, ट्रॉफी आणि प्रशस्तीपत्र मिळवून वेदिका विशाल जगतापला सर्वोत्कृष्ट सायटेशन प्रमाणपत्र मिळवून प्रथम रँकर प्रमाणे चॅम्पियनशिपमध्ये सहभाग मिळवला आहे. जागतिक जपान अबॅकस स्पर्धा १८ मे २०२५ महिन्यामध्ये होत असून त्यामध्ये भारतासह मोरोक्को, नेपाळ, श्रीलंका, युनायटेड किंग्डम, यु एस ए, सिंगापूर, झिंबाब्वे, दक्षिण आफ्रिका, देशांमधील दोन हजार पेक्षा जास्त विद्यार्थी सहभाग घेणार आहेत. वेदिका कांता विशाल जगतापच्या यशामध्ये अबॅकस शिक्षक तसेच वेदिकाची आई-वडील, वेदिकाचे आजी-आजोबा मामा मावशी तसेच इतर नातेवाईकांची सुद्धा मोलाचे सहकार्य लाभले आहे. वेदिका कांता विशाल जगतापची गणित विषया बद्दलची मनात असणारी भीती दूर होऊन अनेक गणिते सहज आणि सोप्या पद्धतीने वेळेच्या आत मध्ये सोडवले जात आहेत असे वेदिकाने सांगितले आहे. ओसाका जपान अबॅकस असोसिएशन चेअरमन रंजन कुमार बेंगलोर, आय सी एम एस मॅनेजिंग डायरेक्टर श्री प्रसाद अग्रवाल तामिळनाडू तसेच अरिस्तो किड्स मॅनेजिंग डायरेक्टर उज्वल पांडा ओरिसा आणि जी एस ए अबॅकस असोसिएशनचे श्रीनिवासन कुमारण दिल्ली, अबॅकस स्टडी सेंटरचे आयोजक डॉ. ए.एस.घोडके यांनी वेदिका कांता विशाल जगतापने मिळवलेल्या यशाचे अभिनंदन केले असून वेदिकाच्या उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिलेल्या आहेत. समाजातील सर्व स्तरांमधून वेदिका कांता विशाल जगतापचे अभिनंदन होत असून उज्वल भविष्यासाठी तिच्या ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल बीड या शाळेमधील इयत्ता ३ - मधील ही विद्यार्थी असून तिचे क्लास टीचर ते प्रिन्सिपल मा.रश्मी अरोरा मॅडम यांचे ही खूप मोलाचे मार्गदर्शन लाभले असे वेदिका ची आई कांता मुळे यांनी सांगितले त्या पोलीस पालक (एक जागृक पालक) असल्यामुळे या छोट्या पोलीस कन्या चे ही पोलीस डिपार्टमेंट मधून त्यांचे वरिष्ठ अधीकारी यांचा पासून ते सहकारी सिनियर जुनियर सर्व शिक्षक, मित्र- मैत्रीण परिवार यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.असे जिल्हा अबॅकस वितरक डॉ .ए. एस घोडके यांनी सांगितले.सर्वांगीन विकास करण्यासाठी भारतीय वैदिक तसेच अबॅकस गणित पध्दत फार उपयोगी आहे असे अबॅकस आणि वैदिक मॅथ मास्टर ट्रेनर डॉ एस. ए. घोडके यांनी सांगितले.



# पीओपी मूर्ती संदर्भात अभ्यासगट स्थापन– पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

मुंबई ।प्रतिनिधी

प्लास्टर ऑफ पॅरिस मूर्तींमुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी विशेष अभ्यासगट स्थापन केला आहे. तसेच यासंदर्भात राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाची मदत घेण्यात येणार आहे, अशी माहिती पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी आज विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य चंद्रकांत नवघरे, वरूण सरदेसाई यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती.मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीचे जलस्रोतामध्ये करण्यात येणाऱ्या विसर्जनामुळे जलप्रदूषणाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशासनुसार केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पीओपी मूर्ती विसर्जनासंदर्भात नव्याने मार्गदर्शक सूचना जारी करून या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यासंदर्भात सर्व राज्यांना निर्देश दिले होते. त्यानुसार राज्य शासनाने पीओपी मूर्ती उत्पादन, विक्री आणि विसर्जनास बंदी घातली आहे.

पीओपी मूर्ती मधील प्रदूषणकारी घटक कमी करणे शक्य होईल का याची पडताळणी करण्यासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक समिती गठीत करण्यात आली आहे. काही वैज्ञानिक संस्थांचे म्हणणे आहे. पीओपी मूर्तीमुळे प्रदूषण होत नाही राज्य सरकारने यासंदर्भात वैज्ञानिक पुरावे मागवले आहेत. याचा अभ्यास करण्यासाठी आयोगाकडे विनंती करण्यात आली आहे. अहवाल प्राप्त झाल्यास केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे (उझउइ) पाठवले जातील आणि शास्त्रीय दृष्टिकोनातून पर्यावरणपूरक आणि पारंपरिकतेला धक्का न लावता सकारात्मक निर्णय घेण्यात येईल

# उद्योजिका, लेखिका रूपाली देशपांडे स्त्री रत्न पुरस्काराने सन्मानित

बीड ।प्रतिनिधी

दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्र, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्ताने राज्यस्तरीय 'स्त्री रत्न' पुरस्कार सोहळा २०२५, शनिवार दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी सकाळी ११.०० वा. हॉटेल नीलकमल हॉल येथे आयोजित करण्यात आला होता. यात बीड शहरातील प्रसिद्ध उद्योजिका तथा लेखिका रूपाली देशपांडे यांना स्त्री रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई चे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे आणि प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्र, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्ताने राज्यस्तरीय 'स्त्री रत्न' पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या पुरस्कार सोहळ्यात विविध क्षेत्रात आपल्या कर्तबगारीने नावलौकिक मिळविलेल्या महिलांना विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.



यात शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या विविध व्यवसाय करत आज रिच इव्हेंट्स आणि रिच टूर्स अँड ट्रॅव्हल्स च्या माध्यमातून नावलौकिक मिळविलेल्या उद्योजिका तसेच वृत्तपत्रातून अनेक सामाजिक समस्या आणि प्रश्नांना आपल्या लेखणी द्वारे मांडणाऱ्या लेखिका रूपाली जयंत देशपांडे यांना स्त्री रत्न पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी होते. विशेष अतिथी तथा प्रमुख सत्कारमुर्ती म्हणून प्राजक्ता सुरेश धस होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात, उपविभागीय जिल्हाधिकारी कविता जाधव, माजी आमदार ड. उषा दराडे, पोलीस उपाधीक्षक पुजा विठ्ठल पवार, उपविभागीय पोलीस अधीक्षक विश्वांभर गोल्डे, जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर, एलसीबी चे पोलीस निरीक्षक उस्मान शेख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ, तहसीलदार चंद्रकांत शेळके, प्रभारी गटशिक्षणाधिकारी समंदर खान पठाण यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

रूपाली देशपांडे यांच्या कार्यकर्तुत्वाची नोंद घेऊन त्यांना स्त्री रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने सविता देव, जयंत देशपांडे, राजेश राजूरकर, स्वाती राजूरकर, जयदीप परळकर, जयसिंग मामा चुंगडे, डॉ. प्रदिप कुमार उजेगर, हरीश मोटवाणी, गंगाबिशन करवा, संपादक दिलीपजी खिस्ती यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या

संपर्क ८८८९५५५३९

# रायमोहा ग्रामपंचायतच्या सरपंच पदी सुभाष क्षिरसागर तर उपसरपंच पदी स्वाती जाधव यांची बिनविरोध निवड

## शिरूर पंचायत समितीचे उपसभापती जालिंदर सानप यांच्या निर्णयाचे सर्वत्र कौतुक

रायमोहा ।प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील रायमोहा येथील ग्रामपंचायतच्या सरपंच पदी सुभाष क्षिरसागर तर उपसरपंच पदी स्वाती जाधव यांची बिनविरोध निवड करण्याचा निर्णय रायमोहा पंचक्रोशीचे युवा नेते तथा शिरूर कासार पंचायत समितीचे उपसभापती जालिंदर सानप यांनी घेऊन सत्तेत बहुजनांचा वाटा या भूमिकेला प्रत्यक्ष कृतीची जोड दिल्याने उपसभापती जालिंदर सानप यांच्या भूमिकेचे सर्वत्र कौतुक होत आहे.



शिरूर कासार तालुक्यातील रायमोहा व दगडवाडी संयुक्त ग्रामपंचायत ची पंचवार्षिक निवडणूक शिरूर पंचायत समितीचे उपसभापती व रायमोहा पंचक्रोशी चे लाडके युवा नेते जालिंदर सानप यांच्या नेतृत्वाखाली लढवण्यात आली होती. या निवडणुकीत स्पष्ट बहुमत मिळवून सौ संगीता सानप यांची सरपंच पदी तर उपसरपंच पदी सुरेश जाधव यांची निवड चार वर्षांपूर्वी करण्यात आली होती. निवडणूक जाहीरनाम्यात ग्रामस्थांना दिलेल्या आश्वासनांची पूर्ती करत रायमोहा गावच्या नागरि समस्या सोडविण्याबरोबरच गावच्या सर्वांगीण विकासाला गतिमान केल्याने नागरिकात समाधान व्यक्त होत आहे. उपसभापती जालिंदर सानप यांनी सत्तेत वाटा सर्वांचा या तत्त्वाला अंगीकारण्याचे धोरण स्वीकारल्याने सरपंच व उपसरपंच पदावर कार्य करण्याची संधी इतरांनाही दिली जावी या उपसभापती सानप यांच्या भूमिकेचे स्वागत करत सरपंच सौ संगीता सानप व सुरेश जाधव यांनी आपल्या पदाचे राजीनामे देऊन या पदावर नव्याने आपल्या गटाचे ज्येष्ठ नेते सुभाष मारुती क्षिरसागर यांची सरपंच पदी तर उपसरपंच पदी स्वाती सखाराम जाधव यांची नव्याने निवड केली. उपसभापती जालिंदर सानप यांच्या बहुजन हिताय बहुजन सुखाय या भूमिकेचे पंचक्रोशीत स्वागत केले जात आहे. उपसभापती जालिंदर सानप यांनी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या बोले तैसा चाले त्याची वंदावीत पावले या अभंगाला कृतीची जोड दिल्याची भावना गावकऱ्यांत व्यक्त होत आहे.

रायमोहा गावाबरोबरच पंचक्रोशीतील विविध गावांमध्ये नागरी सुविधा आणि परिसराचा भौगोलिक विकास व्हावा ही आपली भावना असून परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध घटकांना सोबत घेण्याची आपली भूमिका आहे .अशी भावना यावेळी उपसभापती जालिंदर सानप यांनी व्यक्त केली.

गावच्या विकासाला प्रथम प्रधान्य -सुभाष क्षिरसागर

माजी मंत्री तथा लोकनेते जयदत्त क्षीरसागर ,योगेश क्षीरसागर आणि उपसभापती जालिंदर सानप यांच्या नेतृत्वाखाली रायमोहा गावच्या विकासाला आपण अधिक प्रधान्य देणार असून जालिंदर सानप यांच्या खांद्याला खांदा देऊन आपण काम करत राहणार आहोत अशी भावना यावेळी नवनिर्वाचित सरपंच सुभाष क्षिरसागर यांनी व्यक्त केली........

*नव्या योजना सुरू करू-सौ.स्वाती जाधव रायमोहा गावच्या विकासासाठी राज्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे लोकनेते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर आणि जालिंदर काका सानप यांच्या नेतृत्वाखाली पूर्व योजना पूर्ण करून नवीन योजना सुरू करण्यास प्राधान्य दिले जाईल अशी भावना यावेळी नवनिर्वीचित उपसरपंच स्वाती सखाराम जाधव यांनी व्यक्त केली

इतरांनाही संधी दिली पाहिजे -सौ संगीता सानप सत्तेच्या पदावर कार्य करण्याची संधी इतरांनाही दिली जावी अशी भावना उप सभापती जालिंदर सानप यांनी व्यक्त केल्याने आपण स्वेच्छेने पदाचा राजीनामा दिला व इतरांना त्या पदावर कार्य करण्याची संधी उपलब्ध करून दिली याचाही आनंद वाटतो अशी भावना मावळत्या सरपंच सौ संगीता सानप यांनी व्यक्त केली .सहकार्य करत राहणारच-सुरेश जाधव रायमोहा गावच्या सर्वांगीण विकासासाठी नवनिर्वाचित सरपंच ,उपसरपंच यांना गावच्या विकासासाठी सतत आपण सहकार्य करत राहणार आहोत व विकास कार्यात सक्रिय मदत ही करणार आहोतच अशी भावना मावळते उपसरपंच सुरेश जाधव यांनी व्यक्त केली.

# वडवणीत पत्रकारांचे आंदोलन संपन्न

महाराष्ट्र सरकारने वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे आणि डिजिटल माध्यमांवरील बातम्यांचे संकलन व विश्लेषण करण्याचे काम खासगी संस्थेला देण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय पत्रकारितेच्या मूलभूत तत्त्वांना आणि लोकशाही मूल्यांना बाधा आणणारा असून, माध्यम स्वातंत्र्यावर गंभीर आघात करणारा आहे. हा निर्णय मागे घेण्यासाठी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संघटक मा श्री संजय भोकरे साहेब, राष्ट्रीय अध्यक्ष श्री अशोक वानखेडे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे, राज्य समन्वयक नितीन शिंदे, प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमानी सर, प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी सर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे साहेब यांच्या संकल्पनेनुसार तहसील कार्यालयासमोर निदर्शने करून लेखणीबंद आंदोलन करून तहसीलदार यांना लेखी निवेदन देण्यात आले यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे बीड जिल्हाध्यक्ष अँड विनायक जाधव, वडवणी तालुका अध्यक्ष अशोकराव निपटे,शांतीनाथ जैन तालुका उपाध्यक्ष, अर्जुन मुंडे तालुका सचिव, शंकर झाडे ता.कोषाध्यक्ष, सतिष राव मुजमुले डिजिटल मिडिया वडवणी तालुका



अध्यक्ष,शेख एजाज ता.उपाध्यक्ष, अशोकराव फपाळ ता.सचिव, अंकुश गवळी कोषाध्यक्ष, श्रीनिवास काकडे पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती वडवणी तालुका अध्यक्ष, ज्ञानेश्वर लंगे उपाध्यक्ष, गंगाभिष्म आंडील सचिव, शंकर जाधव कोषाध्यक्ष, विष्णु डोईफोडे सदस्य इत्यादी उपस्थित होते.

# मानूरच्या उपसरपंच पदी मोहब्बत खान पठाण यांची बिनविरोध निवड

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील श्रीक्षेत्र नागनाथ मानूर ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदाची निवडणूक काल दिनांक १२ मार्च रोजी बिनविरोध पार पडली. सरपंच अशोक मामा पाखरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवडणुकीत उपसरपंच पदी मोहब्बत खान समशेर खान पठाण यांची बिनविरोध निवड झाली .या बैठकीला ग्रामपंचायतचे सर्व १४ सदस्य उपस्थित होते. बिनविरोध निवड झाल्यानंतर सर्वांनी जाटवडच्या गोपीनाथ गडावर जाऊन आनंदोत्सव साजरा केला.

दोन वर्षांपूर्वी मानूर ग्रामपंचायत पंचवार्षिक निवडणूक झाली या निवडणुकीत सरपंच पदी अशोक मामा पाखरे यांची जनतेतून प्रचंड मताधिक्याने निवड झाली होती त्याचवेळी उपसरपंच पदी श्रीमती सविता अर्जुन बनसोडे यांची निवड झाली दरम्यान श्रीमती बनसोडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या या पदाची निवडणूक १२ मार्च रोजी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली सरपंच अशोक मामा पाखरे यांना निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तहसीलदारांनी प्राधिकृत केले होते. सकाळी दहा वाजता निवडणूक प्रक्रिया सुरू झाली दुपारी बारा वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत होती मात्र उपसरपंच पदासाठी एकमेव अर्ज मोहब्बत खान समशेर खान पठाण यांचा दाखल झाल्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी पठाण यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले या बैठकीला मंडळ अधिकारी निळकंठ सानप, ग्राम विस्तार अधिकारी डी एम वाणी , ग्राम महसूल अधिकारी भगवान टाक , यांच्यासह श्रीमती सविता अर्जुन बनसोडे ,गुलाब दगडू पठाण ,गीता अनिल बडे ,ललिता गहिनीनाथ सुरसे, सुभाष मोहनराव सीरसाट, ज्योती भगवान पाखरे ,सुमय्या आदम पठाण ,रामदास बापूराव गावडे ,मीरा भीमराव पवार ,संजू विठ्ठल ढाकणे ,वेणूबाई रणजीत गुजर हे ग्रा प सदस्य उपस्थित होते.



उपसरपंच पदाची बिनविरोध निवड झाल्यानंतर सर्व ग्रा प सदस्यांनी जाटवडच्या गोपीनाथ गडावर जाऊन विजय उत्सव साजरा केला. याप्रसंगी ज्येष्ठ उद्योगपती तथा मानूर चे सुपुत्र लिंबा शेठ नागरगोजे, ज्येष्ठ पत्रकार संतोष मानूरकर, कलंदर काका पठाण, पोपटराव शिरसाट, उल्हास पाखरे सर आदी उपस्थित होते.

रमजानच्या पवित्र महिन्यात मुस्लिम समाजाला दिली संधी

रमजानचा पवित्र महिना सुरू असताना मानूर मध्ये सामाजिक सलोखा जपण्याचे काम सरपंच अशोक मामा पाखरे यांनी केले आहे. या गावात मुस्लिम समाजाचे तीन सदस्य असून त्यापैकी मोहब्बत खान पठाण यांना उपसरपंच पदी संधी देण्यात आली. मानूर या गावामध्ये नेहमीच सामाजिक सलोखा जपण्याचे काम झालेले आहे .हिंदू आणि मुस्लिम दोन्ही समाजाचे लोक या गावात वर्षानुवर्ष सर्व प्रकारचे सण उत्सव एकत्रितपणे साजरे करतात. हाच सामाजिक सलोख्याचा वारसा पुढे घेऊन जाण्याचे काम सरपंच अशोक मामा पाखरे यांनी केले आहे.

लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांचा आदर्श समोर ठेवला-सरपंच पाखरे

राजकारण आणि समाजकारण करताना सर्व जाती धर्माला सोबत घेऊन जाण्याचे काम करा असा संदेश लोकनेता पंकजाताई मुंडे यांनी नेहमी कार्यकर्त्यांना दिलेला आहे.त्यांचा आदर्श समोर ठेवून तसेच त्यांच्याच आदेशानुसार मानूर ग्रामपंचायत च्या उपसरपंच पदी मुस्लिम समाजाला प्रतिनिधित्व दिले असल्याचे सरपंच अशोक मामा पाखरे यांनी सांगितले.

# वृद्धत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र, लोखंडी सावरगाव येथे भव्य मोतीबिंदू नेत्र शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

बीड (प्रतिनिधी)

दि.११/०३/२०२५ रोजी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य मोतीबिंदू नेत्र शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले. सदर शिबिरात एकुण ५८ रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. सुनिल जाधव यांनी शिबिराचे नियोजन केले.

शिबिरात नेत्रशल्य चिकित्सक डॉ. चंद्रकांत वाघ, डॉ. राधेश्याम जाजु, डॉ. रविंद्र गालफाडे, डॉ.प्रदीप सानप व डॉ.नारायण आळने यांनी शस्त्रक्रिया केल्या. सदर शिबिरासाठी श्रीमती मैथिली कुलकर्णी, श्री.महावीर मांडावे, श्री. संजय रामपुरकर, श्री. दिपक गायकवाड, श्री. ज्ञानेश्वर शेळके आणि श्री. सुमित कुलकर्णी यांनी नेत्र चिकित्सा अधिकारी म्हणून काम पाहिले. त्याचबरोबर शस्त्रक्रिया गृह आणि वार्ड मध्ये सहाय्यक अधीसेविका श्रीमती कौसर बानु शेख यांच्या अधिनस्त परीसेविका श्रीमती काशीबाई अंबाड आणि श्रीमती रजनी भालेराव तर अधिपरीचारिका श्रीमती लीला मस्के, निशा चिखले, अरुण फड आणि महादेव इंगळे यांनी व स्त्री रुग्णालय आणि वृद्त्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र येथील सर्व अधिपरीचारिका यांनी सहकार्य केले. तसेच शिबिरात शस्त्रक्रिया सहाय्यक श्री. अमरदीप जोगदंड, विजय महाजन, ज्ञानेश्वर करपे, अक्षय मोहिते, शेख सत्तार, भागवत टाकसाळकर, शहीद शेख आणि ज्ञानेश्वर लाटे यांनी परिश्रम घेतले. तर शिबीर यशस्वितेसाठी डॉ. सुशील पवार, डॉ. बालासाहेब मेढे,



डॉ. महादेव केंद्रे, डॉ. दिलीप गायकवाड, डॉ. वासंती चव्हाण डॉ. अनुराधा शिनगारे , डॉ. विमला इडगार आणि डॉ. संतोष कदम उपस्थित होते. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी शिबिराच्या दुसऱ्या दिवशी सर्व रुग्णांची भेट घेतली व सर्व अधिकारी कर्मचारी यांचे कौतुक करून आभार मानले.येणाऱ्या आर्थिक वर्षात या ठिकाणी उच्चांक प्रस्थापित करत ७००० पेक्षा जास्त मोतिबिंदु शस्त्रक्रिया करण्याचा मानस आहे. त्यामुळे इतर जिल्ह्यात जाऊन मोतीबिंदु शस्त्रक्रिया करण्याचे प्रमाण कमी होईल.

# उम्मेहनी शेख स्त्री रत्न पुरस्काराने सन्मानित

बीड ।प्रतिनिधी

शहरातील मानाच्या राज्यस्तरीय स्त्री रत्न पुरस्काराने ग्रेट अबॅक्स तज्ञ उम्मेहनी मुख्तार शेख यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन सन्मानित करण्यात आले. या मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.महिला फक्त चूल अन् मूल नव्हे तर पुरुषांच्या बराबरीने सर्वच कामे करीत आहे. महिला शिक्षक, इंजिनिअर, डॉक्टर, शास्त्रज्ञ, पायलट सर्वच क्षेत्रात कामातून आपली ओळख निर्माण केली. आतातरी बस आणि ट्रक ड्रायव्हर म्हणून महिला पुढे आल्या आहेत. ही पुरुषांची कामे करताना त्या एक आई, पत्नी, बहीण याही भूमिका पार पाडतात. घरातील सर्व कामे करुन ते आपले कर्तव्य निष्ठेने पार पाडतात अशा उल्लेखनीय कामगिरी करुन आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या




महिलांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई, दै. समर्थ राजयोग व आश्रय सेवा केंद्र, बीड यांच्यावतीने राज्यस्तरीय स्त्री रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये बीड शहरातील ग्रेट अबॅक्स तज्ञ उम्मेहनी मुख्तार शेख या अनेक चिमुकल्यांना शिक्षणाची आवड निर्माण होण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. याच कार्याची दखल घेऊन त्यांना स्त्री रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा सन्मान सोहळा शहरात पार पडला. यावेळी माजी आ. उषा दराडे, प्राजक्ता धस, उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, केजच्या नगराध्यक्ष सीता बनसोड आदींची उपस्थिती होती. स्त्री रत्न पुरस्काराने गौरविण्यात आल्याने उम्मेहनी शेख यांचे नातेवाईक सह सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

# संजय कुंबेफळकर यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान

बीड (प्रतिनिधी)

बीड येथील संकल्प व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्राचे प्रकल्प संचालक संजय कुंबेफळकर यांना नुकताच युवा महाराष्ट्र फाऊंडेशन तर्फे दिला जाणारा महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२५ चा सिने अभिनेत्री रुपाली कदम ( अभिनेत्री ) व सिने अभिनेत्री रुतुजा लिमये याच्या हस्ते सन्मानित करण्यात आले असून हा पुरस्कार पं . जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक सभागृह , शिवाजी नगर , पुणे येथे संपन्न झाला आहे.

व्यसन हा गंभीर मानसिक आजार असून तो योग्य उपचार , समुपदेशन , योग्य मार्गदर्शन यांच्या संगनमताने सहज सुटु शकते. व्यसनी लोकांना योग्य आधाराची गरज आहे हे ओळखून त्यांनी जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर व्यसन मुक्त समाज निर्माण होण्याच्या दृष्टीकोनातून त्यांनी हजारो व्यसनी लोकांना व्यसनातून मुक्त करून चांगल्या प्रकारे संसार करत आहेत. आपल्या कार्यातून व्यसनमुक्त महाराष्ट्र.... सक्षम महाराष्ट्र या प्रेरणे ने व्यवसनाने त्रस्त असलेल्या व समाजाने दुर्लक्षित केलेल्या व्यक्तीना व्यसनाच्या विळख्यातून बाहेर काढून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेला प्रयत्न आणि समाजाशी नाळ कायम ठेवत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या संजय कुंबेफळकर यांच्या कार्याची दखल घेऊन प्रत्येक जिल्ह्यातील कर्तृत्ववान व्यक्तींचा त्यांच्या कार्यक्षेत्रात दिलेल्या बहुमुल्य योगदानाबद्दल तसेच कर्तृत्वाबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी बीड जिल्हा त व सपुर्ण महाराष्ट्र




राज्यात प्रगतीमध्ये आपली महत्वाची भूमिका बजावली असून यात कर्तुत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यांच्या दृष्टिकोनातून समाजासाठी खुप मोठे योगदान आपले आहे या विचार सुत्रावर आयोजित केलेल्या युवा महाराष्ट्र फाऊंडेशनच्या महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२४ उपक्रमात आपल्याला महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे . ब्रेन केअर हॉस्पिटल व संकल्प व्यसनमुक्ती केंद्राचे सर्वेसर्वा बीड येथील प्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ . मुजाहेद सर याच्या नियोजनाखाली व्यसनमुक्ती केंद्रात नियोजनबद्द कामामुळे सदरील व्यक्ती उपचार घेत आहेत. पुरस्कार मिळाल्या बदूल डॉ . मुजाहेद सर यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या तसेच व्यसनमुक्ती केंद्राच्या समन्वयक सौ. रेखा कुंबेफळकर मॅडम, नर्मदा गायकवाड मॅडम, मनिषा पवार मॅडम, छाया लाड, अनिता शिंद,आरिफ शेख, सरफराज शेख, प्रताप हातागळे, राम मस्के , अनंत जोशी, कालीदास मस्के, ईश्वर निर्मळ अभिनंदन केले.

# धर्माबादेत शाळा व्यवस्थापन व विकास समिती प्रशिक्षणास प्रारंभ

धर्माबाद ( अशोक पडोळे )

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नांदेड मार्फत स्टार्स व समग्र शिक्षा अभियान अंतर्गत जिल्हा परिषद व्यवस्थापनाचे प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे दोन दिवसीय व्यवस्थापन व विकास समिती चे प्रशिक्षणास उत्साहात आणि आनंदी वातावरणात प्रारंभ झाले. धर्माबाद तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी रविशंकर मरकंटे यांचे मार्गदर्शनाप्रमाणे केंद्र प्रमुख आबासाहेब उस्केलवार व सेवा जेष्ठतम शिक्षक बाबुराव वडजे सर यांच्या हस्ते प्रशिक्षणाचे उदघाटन करण्यात आले.

शाळा व्यवस्थापन समिती व शाळा विकास समिती चे सबलीकरण,अधिकार आणि कर्तव्य यांचा अभ्यास होण्यासाठी तालुकास्तरीय प्रशिक्षणाचे जि.प.कें.प्रा.शाळा रत्नाळी ता.धर्माबाद येथे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील बाळापूर, रत्नाळी, जारीकोट व चिकना संकुलातील प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळातील प्रत्येकी एका शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. सदरील प्रशिक्षणाची सुरुवात बुधवार दिनांक १२ मार्च २०२५ रोजी झाली. दोन दिवस चालणाऱ्या या प्रशिक्षणात समिती विषयी सखोल अशी माहिती देण्यात येणार आहे. जिल्हा स्तरावर प्रशिक्षण घेतलेले सुलभक माधवराव




भोसले,नविनकुमार आरगुलवार,रविकांत मडोळे ,आणि गंगाधर मदनुरकर मार्गदर्शन करत आहेत. केंद्रप्रमुख आबासाहेब उस्केलवार हे याप्रशिक्षणाचे प्रमुख म्हणून काम पाहत आहेत. या प्रशिक्षणातून तालुक्यातील सर्व शिक्षकांना व्यवस्थापन समिती व शाळा विकास समिती याविषयी माहिती दिली जाणार आहे.

# सरकारी मीडिया मॉनिटरिंग खासगी संस्थेकडे देण्याच्या निर्णयाला विरोध

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने दिला लेखणीबंद आंदोलनाचा इशारा

लोहा ।प्रतिनिधी

महाराष्ट्र सरकारने वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे आणि डिजिटल माध्यमांवरील वातम्यांचे संकलन व विश्लेषण करण्याचे काम खासगी संस्थेला देण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय पत्रकारितेच्या मूलभूत तत्त्वांना आणि लोकशाही मूल्यांना बाधा आणणारा असून, माध्यम स्वातंत्र्यावर गंभीर आघात करणारा आहे.हा निर्णय तातडीने मागे घेण्यात यावा या मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने तहसीलदार बुधवारी दि १२ मार्च रोजी देण्यात आले आहे.

तशिलदार देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की,पत्रकारितेचा मुख्य हेतू जनतेपर्यंत सत्य व वस्तुनिष्ठ



माहिती पोहोचवणे हा आहे. मात्र, सरकारकडून या कामासाठी खासगी संस्था नेमण्याचा निर्णय घेतल्याने बातम्यांवर अप्रत्यक्ष सेन्सॉरशिप लादली जाण्याचा धोका आहे. हा निर्णय सरकारविरोधी मतप्रवाह दडपण्याचा आणि प्रसारमाध्यमांवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे दिसते.देशाच्या लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी आणि पत्रकारितेच्या स्वतंत्र भूमिकेचे संरक्षण करण्यासाठी आम्ही महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने या निर्णयाला तिव्र विरोध करतो आहोत. सरकारने पारदर्शकता न ठेवता खासगी संस्थेला हे काम सोपवणे म्हणजे माध्यमांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रयत्न आहे. सरकार कडून लादली गेलेली ही अघोषित आणीबाणी त्वरित मागे न घेतल्यास येत्या १२ मार्च रोजी महाराष्ट्राचे संवेदनशील आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती दिवशी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, राज्यव्यापी लेखणीबंद आंदोलन करण्यात येईल. हा निर्णय तातडीने मागे घेण्यात यावा या मागणीचे निवेदन तहसीलदार विठ्ठल परळीकर यांना देण्यात आले आहे.यावेळी जिल्हाध्यक्ष निवड समिती केशव पाटील पवार ज्येष्ठ पत्रकार सुरेश राघोजी जोंधळे डी एन कांबळे सुरेश महाबळे प्रवीण महाबळे सुनील चव्हाण विशाल घंटे विश्वनाथ कांबळे संग्राम चव्हाण रमेश पवार आधी उपस्थित होते.

# स्वामी विवेकानंद पतसंस्थेत जागतिक महिलादिन विविध उपक्रमांनी साजरा

डॉ आशिष तिवारी/जालना

जालना येथील स्वामी विवेकानंद पतसंस्थेत महिला सन्मान सोहळा, महिलांफसाठी विविध स्पर्धा आदी विविध उपक्रमांचे आयोजन करून आगळयावेगळया पद्धतीने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अभय कुलकर्णी हे होते. प्रमुख पाहुण्या म्हणून सीए श्रीमती धन्नावत ह्या होत्या तर व्यासपीठावर संस्थेचे सचिव प्रसन्ना जाफ्राबादकर यांची उपस्थिती होती. यावेळी श्रीमती धन्नावत म्हणाल्या की, एक ही नारी सब पर भारी हे आपण ऐकतो, पण खऱ्या अर्थाने तेव्हा



भारी होते, जेव्हा तिला अंतर्गत शक्तीची जाणीव होते. जसे हनुमानाला स्वतःच्या शक्तीची जाणीव करून देण्यासाठी त्याची स्तुती करावी लागली, तसेच महिलांनाही त्यांच्या अंतर्गत असलेल्या अमर्याद सामर्थ्याची जाणीव करून देण्यासाठी महिला दिन साजरा केला जातो. श्रीमती धन्नावत यांनी सादर केलेल्या प्रेरणादायी कवितेने उपस्थित महिलांच्या मनात नवचैतन्य संचारले. अध्यक्षीय समारोपात अभय कुलकर्णी म्हणाले की, आजच्या युगात महिला कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत. स्वामी विवेकानंद पतसंस्थेमध्ये एकूण कर्मचाऱ्यांमध्ये महिलांचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यामुळे संस्थेचा कारभार महिलांच्या सक्षम नेतृत्वाखाली अधिक प्रभावीपणे चालतो, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. संस्थेने महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने नवचेतना महिला बचत गट सुरू केला असून, याअंतर्गत आतापर्यंत २० महिलांना रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत.

संस्थेच्या मुख्य व्यवस्थापिका सौ. रेणुका पुराणिक म्हणाल्या की आज महिलांची सुरक्षितता हा गंभीर प्रश्न आहे. पण या परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी आपण सगळ्यांनी एकत्र यायला हवे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्योत्सना जाधव यांनी केले. यावेळी संस्थेच्या महिला कर्मचारी, बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गुरवार रोजी सुरेशानंदजी महाराज शास्त्री यांचे कीर्तन

बीड ।प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील सातव्या पुण्यतिथी फाल्गुन शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. महंत गुरूवर्य सुरेशानंदजी महाराज शास्त्री श्रीक्षेत्र श्रृंगऋषी गड यांचे गुरुवार दिनांक १३ मार्च २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मंडळी ढेकणमोह ता. जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे.



तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भाद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

# शेंद्रीय आणि रासायनिक शेतीचा समतोल राखा !

## कृषी अधीक्षक सुभाष साळवे यांचे शेतकऱ्यांना आवाहन

**सिरसाळा (प्रतिनिधी)**

**रासायनिक खतांचा वापर वाढल्यामुळे शेतीचा पोत खराब होत असून भविष्यात त्याचे गंभीर परिणाम दिसू लागतील. हे टाळायचे असेल तर शेतकरी बांधवांनी शेंद्रीय आणि रासायनिक शेतीचा समतोल राखावा, असे आवाहन बीड जिल्हा कृषी अधीक्षक सुभाष साळवे यांनी केले.**

शेतकरी कीर्तन महोत्सवात 'शेतकरी योजना, शेती उद्योग आणि शेंद्रीय शेती ' या विषयावर ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, रासायनिक खत, पवारण्या याच्या अती वापरामुळे शेतीमधील कीटकांची जीवन साखळी विस्कळीत झाली आहे. शेतीमध्ये काही जीव जंतू हे शेतीला लाभदायक असतात तर काही हानीकारक असतात. हानीकारक किकांना खाण्याचे काम काही किचकट करतात. त्यातूनच शेतीचा समतोल राखला जाती. कधी कधी हानीकारक असणाऱ्या कीटकांची संख्या वाढते तेव्हा किटक नाशक फवारणीचा पर्याय असतो. पण अलिकडे किती गरज आहे याचा विचार न करता भरमसाठ किटक नाशक फवारले जातात. परिणाम उपयुक्त आणि हानीकारक दोन्ही तऱ्हेचे किटक संपत आहेत. त्यातून नैसर्गिक जीवन साखळी विस्कळीत होत आहेत. म्हणून शेतकऱ्यांनी शेंद्रीय शेताचा पर्याय निवडला तर अधिक लाभ होऊ शकतो. रासायनिक खतांचा वापर टाळला तर कदाचित थोडे उत्पादन कमी होईल. पण त्याच वेळी खर्चही कमी होईल, असेही साळवे म्हणाले.

यावेळी त्यांच्या सोबत आलेल्या अधिकाऱ्यांनी विविध शासकीय योजनांची माहिती दिली. त्या योजनांचा लाभ घेण्यासाठीची सर्व प्रक्रियाही त्यांनी समजावून सांगितली... यावेळी जिल्हा कृषी अधिकारी, धारूर तालुका कृषी अधिकारी, कृषी सहाय्यकासह बीड कृषी विभागाचे अनेक अधिकारी उपस्थित होते.

खर्चात वाढ आणि उत्पन्नात घट झाल्याने शेतकरी अडचणीतएकनाथ महाराज माने यांचे अनुभवाचे बोल खत-बीयान्याचे भाव दिवसेंदिवस वाढत आहेत. मजूर मिळत नाहीत. एकंदर शेतीचा खर्च वाढत आहेत. शेतमालाचे भाव मात्र त्या पटीत वाढत नाहीत. म्हणून शेतकरी अडचणीत आहे. मी स्वत: शेतकरी असल्याने हे सर्व अनुभवतो आहे, असे वांगी संस्थानचे अध्यक्ष ह. भ. प. एकनाथ महाराज माने यांनी सागितले. शेतकरी कीर्तन महोत्सवातून शेतकऱ्यांचे मनोबल वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शेतकरी कीर्तन महोत्सवाचे दुसरे कीर्तन पुष्प गुंफताना ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, वारकरी जेवढे आहेत तेवढे शेतकरी आहेत. संकटात असताना शेतकरी भजन - कीर्तनातून आपले दु:ख हलके करतात. तोच या कीर्तनातून होत आहे. गावातून येणाऱ्या भाकरी आणि त्याची होणारी सामोहिक पंगत ही जातीय सलोखा बळकट करणारे उपक्रम आहेत, असेही माने महाराज म्हणाले.






# पालीच्या महसूल विभागाच्या कर्तव्यदक्ष मंडळ निरीक्षक शितल चाटे यांना राज्यस्तरीय रयत सामाजिक प्रतिष्ठानकडून सन्मानित

बीड (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील पाली महसूल विभागाच्या कर्तव्यदक्ष मंडळ निरीक्षक, शितल चाटे यांना महाराष्ट्र राज्य रयत सामाजिक प्रतिष्ठानकडून स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. हा सन्मान अविनाश पाठक बीडचे जिल्हाधिकारी , शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी, कविता जाधव उपविभागीय अधिकारी आणि चंद्रकांत शेळके तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली त्या पाली मंडळा खूप चांगल्या पद्धतीने काम करत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्याची निवड करण्यात आली होती. त्यानिमित्त शितल चाटे याना सन्मानित करण्यात आले आहे.

शितल चाटे यांनी आपल्या कार्यकाळात बीड जिल्ह्यातील पाली महसूल विभागामध्ये, त्यांच्या कर्तव्यावर अगदी प्रामाणिकपणे कार्यरत राहून जनतेच्या अडचणींच्या निराकरणासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यांनी पावसामुळे होणाऱ्या शेतकऱ्यांच्या नुकसानाचे पंचनामे करून तसेच शासनाच्या मदतीसाठी प्रयत्नशील राहिले आहेत.

गोरगरीब शेतकऱ्यांना पावसामुळे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी शासनाकडून आवश्यक मदत मिळवण्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी जाऊन काम केले आहे. त्यांच्या प्रामाणिक कामगिरीमुळे सु परिचित आहेत, जेथे त्यांनी मोठ्या जबाबदारीसह काम केले आहे.शितल चाटे यांनी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीद्वारे न्याय मिळवून देण्यासाठी यशस्वीपणे काम केले आहे. त्यांच्या या कार्याचा सन्मान म्हणून महाराष्ट्र राज्य रयत सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने आर.जी. माने यांच्या हस्ते त्यांना स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी त्यांच्या पुढील प्रशासकीय कर्तव्यांसाठी मनस्वी शुभेच्छा देण्यात आल्या. शितल चाटे यांचा हा सन्मान त्यांच्या उत्कृष्ट कार्याचे

# रयत सामाजिक प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण २०२५ सोहळा मोठ्या उत्साहात साजरा

बीड (प्रतिनिधी)

दिनांक ९ मार्च २०२५ रोजी रोजी सामाजिक रयत प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा उत्साहामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन नगर रोड बीड येथे साजरा झाला रयत सामाजिक प्रतिष्ठान गेल्या पाच वर्षापासून समाजकार्यामध्ये सर्वात अग्रेसर असलेले प्रतिष्ठान असल्याचे पुरस्कार वितरण करणाऱ्या मान्यवर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले या पुरस्काराचे आयोजक सौं रोहिणी ताई गणेश माने अध्यक्ष संस्थापक रयत सामाजिक प्रतिष्ठान व श्रीमती सुलोचना हनुमंतराव माने बीड यांनी केले या रयत सामाजिक प्रतिष्ठान हे लोकांचे मनोबल वाढावे या उद्देशाने हा पुरस्कार देऊन सामाजिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्यांना सन्मानपत्र देऊन पुरस्कार स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करत आहे या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर यांची उपस्थित लाभली मग युट्युब स्टार म्हणून ऊसतोड कामगाराची मुलगी संध्या मस्के तसेच सामाजिक क्षेत्रामध्ये अतिशय उत्कृष्ट उल्लेखनीय कार्य करणारे समाजसेवक असो यांचा देखील सामाजिक रयत प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय पुरस्कार त्यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना प्रतिष्ठानचे स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले या पुरस्कारासाठी मुंबई येथील कोळी समाज



भूषण पुरस्कार प्राप्त तसेच कोळी समाजाचे भूषण असलेले मा राजेश दादा खर्डे मुंबई वेसावकर तसेच पुणे येथील कैलास कैलास दादा पठारे हे ज्येष्ठ समाजसेवक लाभले सेवानिवृत्त आयुक्त विठ्ठल मुर्केवार जनतेचे कर्णधार संपादक लक्ष्मण लटपटे ड संगीताताई धसे ज्येष्ठ पत्रकार द्वारकादास फटाले काका बीड येथील नामांकित समाजसेवक सुशील जी खटोड तसेच पेठ बीड भागातील उत्कृष्ट समाज सेवेचे कार्य करणाऱ्या समाज सेविका सौ शारदाताई विजेंद्र सिंह डुलगच यांच्या सर्वांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार सन्मान सोहळा संपन्न झाला या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष उद्योजक व आयोजक यांच्या हस्ते हा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला या वेळी पुणे महिला अध्यक्ष मंजुषा रानवडे संपादक वैभव स्वामी शीला सिस्टर लखन चव्हाण शाहीर युवराज ढगे व सदस्य बालकल्याण समिती संतोष वारे तुषार जाधव व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्साहाच्या आणि आनंदाच्या वातावरणामध्ये पार पडला या कार्यक्रमांमध्ये विविध क्षेत्रातील मान्यवरांचे मनोबल वाढावे या उद्देशाने हा पुरस्कार वितरण सोहळा प्रतिवर्षी राबवला जातो व महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील मान्यवरांना हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येतो त्यात संपादक शेख रिजवान भाई व समाज सेवक सुशील जी खटोड प्राध्यापक संजय विश्वनाथराव कांबळे लखन चव्हाण सचिन पंडित शाहीर युवराज ढगे रंग कर्मी सिने कलाकार जतीन छगन वाघमारे सुग्रीव शिंदे व बीड जिल्हा ऑटो रिक्षा परमिट धारक युनियन बीड जिल्ह्यातील नॅशनल खेळाडू प्रगती मिलिंद पोटभरे आनंद कुलकर्णी ग्रामपंचायत अधिकारी नामलगाव बीड येथील समाजसेवक बळीराजे वाघमारे विश्वनाथ एकनाथ डोळस सरपंच नामलगाव संपादक तथा संस्थापक अध्यक्ष लोकशाही पत्रकार संघ भागवत जी वैद्य सर पत्रकार व इतर सर्व क्षेत्रातील मान्यवर रयत सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने त्यांना स्मृतिचिन्ह पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुदेश ना सरवदे आकाश जाधव व कार्यक्रमचे मार्गदर्शक म्हणून लाभलेले ओमप्रकाश गिरी बाजीराव ढाकणे तसेच ज्येष्ठ पत्रकार द्वारकादास फटाले व ज्ञानेश्वर वायबसे पत्रकार नितेश उपाध्यय पत्रकार बालाजी जगतकर पत्रकार संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर मयुरी ताई बांगर व रयत सामाजिक प्रतिष्ठानचे किशोर देवा कुलकर्णी प्रकाश गाडे विक्रम गायकवाड विजय धुनक नाना शेख कैलास टेकाळे गणेश दहिवाळ आरती शुक्रे पत्रकार किशोर सोनवणे शंकर पवार व सर्व संपादक पत्रकार या वेळी उपस्थित होते तसेच महाराष्ट्र राज्य रयत सामाजिक प्रतिष्ठान या प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी सदस्य यांचा देखील रयत सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आर जी माने यांनी सर्वांना सन्मानपत्र देऊन त्यांचा देखील त्यांच्या कार्याचा गुणगौरव करून त्यांना देखील सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले..

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).




## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी साजरी

केज/प्रतिनिधी

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत दि.१०मार्च२०२५ सोमवार रोजीक्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस श्रीमती गिताताई अंडील,श्री.राजाभाऊ कदम अ.मुख्याध्यापक यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व पुण्यतिथी साजरी करण्यात आली. प्रास्ताविक राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी केले. सर्व शिक्षक,शिक्षिका, विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री बाळासाहेब राठोड यांनी केले.श्रीमती सोनाली भुमकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सरवदे, उपाध्यक्षा सीमा मोहिते, सदस्य,राधाआक्का खामकर व गावकरी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

## राष्ट्रीय एकात्मता की, ऐतिहासिक संदर्भ नेमके काय महत्त्वाचे

# हे ठरविण्याची वेळ आली आहे

# सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

भारत देशातील सद्य:परिस्थिती पाहता देश जातीच्या, धर्माच्या, पंथाच्या, गरीबी श्रीमंती या भेदभावाच्या आधारावर उभ्या फुटीच्या मार्गावर जात आहे. इतिहासाचा उपयोग करून संधी साधू राजकारणी आपला मतलब साध्य करण्यासाठी विविध जाती धर्मांमध्ये भांडण लावण्यासाठी ऐतिहासिक संदर्भांचा उपयोग करीत आहेत. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता महत्त्वाची की, इतिहासामधील ऐतिहासिक संदर्भ महत्त्वाचे याचे परीक्षण करण्याची वेळ आली आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांनी केले. ते सेंट एँथनी स्कूल मधील वार्षिक क्रीडा महोत्सवाच्या बक्षीस वितरण प्रसंगी उदघाटक मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर फादर प्रदीप कुमार, मेजर दिलीप निकम, प्राचार्य नन आरोग्यम यांची प्रमुख उपस्थिती होती. या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन डॉ.राजेश इंगोले व मेजर दिलीप निकम यांच्याहस्ते क्रीडा ज्योत पेटवून करण्यात आली. यावेळी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी राजकारण्यांनी या देशाचे वाटोळे करण्याचा प्रन केलेला आहे. आपल्यालाच राज्यसत्ता प्राप्त व्हावी म्हणून माणसांमध्ये जाती-धर्माच्या आधारे द्वेष निर्माण करून सामाजिक एकात्मते मध्ये दोन्ही करण्याचे पाप हे राजकारणी करीत आहेत. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता प्रचंड प्रमाणात धोक्यामध्ये आलेली आहे. त्यामुळे आता सध्या परिस्थितीमध्ये सामान्य जनतेने घडत असलेल्या गोष्टींचे आकलन करून त्या योग्य आहेत की अयोग्य हे ठरवण्याची वेळ आलेली आहे कोणताही राजकारणी विश्वासार्ह न राहिल्याने विश्वास कुणावर ठेवायचा हा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडलेला आहे. महापुरुषांच्या जीवनावरील चित्रपट विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये प्रेरणा निर्माण करण्यापेक्षा इतर जातींविषयी द्वेष निर्माण करण्याचे काम करीत आहे. किंबहुना हे चित्रपट याच हेतून काढलेत की काय अशी शंका मनामध्ये राहून राहून येते. त्यामुळे समाजातील जबाबदार घटकांनी डॉक्टर्स, वकील, शिक्षक, प्राध्यापक यांनी आपली जबाबदारी ओळखून विद्यार्थ्यांना, समाजाला काय चूक आहे व काय बरोबर आहे याचे योग्य मार्गदर्शन केले पाहिजे. जनतेला इतिहासामध्ये काय घडले आहे, कसे चुकीचे घडले होते यामध्येच गुंग करून अडकवून ठेवले आहे. काय चुकीचे घडले यापेक्षा काय बरोबर घडवायचे आहे यावर विचारमंथन होणे गरजेचे आहे. सद्य:स्थितीमध्ये राष्ट्राने काय प्रगती केली आहे, सरकारने लोकांसाठी कोणत्या जनहित कार्य योजना आणलेले आहेत याचा उहापोह होऊ नये म्हणून सरकार भावनिक मुद्दे निर्माण करून विकासाच्या मुद्द्यांवरून जनतेचे लक्ष भरकटवून टाकत आहे. हे षडयंत्र लोकांच्या लक्षात आले पाहिजे याकरिता समाजातील जबाबदार घटकांनी आपली जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडली पाहिजे. समाजामध्ये ज्या पद्धतीने गुन्हेगारीचे उदात्तीकरण होत आहे. युवकांपुढे गुंड लोक रोल मॉडेल म्हणून येत आहेत. समाजामध्ये स्त्रिया सुरक्षित नाहीत रोज खुनाच्या, बलात्काराच्या घटना ऐकून कान सुन्न झाले आहेत. याचं कारण म्हणजे पुस्तकातलं पहिलं पान शिकवायचंच राहून गेलेल आहे ज्यामध्ये भारत माझा देश आहे आणि सारे भारतीय माझे बांधव आहेत हे लिहिलं आहे. ही खंत डॉ. इंगोले यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी आपले कला, क्रीडा कौशल्य वापरून आपल्या बुद्धीचा मेंदूचा शरीराचा विकास करून घेऊन सशक्त आणि निरोगी बनावे व राष्ट्रहितासाठी कार्य करावे अशी अपेक्षा डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी फादर प्रदीप कुमार यांनी विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये आनंदी राहण्यासाठी अभ्यासासोबतच एखादी कला किंवा क्रीडा कौशल्य आत्मसात करावे असे आवाहन केले. यावेळी बोलताना मेजर दिलीप निकम यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेली मी, प्रथम भारतीय व अंतिमतः भारतीय ही गोष्ट प्रत्येक भारतीयाने लक्षात ठेवून देशाप्रती समर्पणाची भावना ठेवली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी विविध क्रीडा प्रकारांमध्ये नैपुण्य दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांना डॉ.राजेश इंगोले व मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.




## नाफेड शासकीय हमीभावाने तूर विक्रीसाठी ऑनलाईन नोंदणी सुरू - सभापती रमजान तांबोळी

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील तूर उत्पादक शेतकऱ्यांसाठी मतदार संघाचे लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नाने कृषी उत्पन्न बाजार समिती कडा येथे शासकीय तूर खरेदी केंद्राला मंजुरी मिळाली असून सर्व शेतकऱ्यांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह ऑनलाईन नोंदणीसुरू झाली असून ऑनलाईन नोंदणी दि.२४ मार्च पर्यंत करून घ्यावी असे आवाहन बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे. ७५५० प्रति क्विंटल दराने तुर खरेदी केली जाणार आहे.

आष्टी मतदारसंघाचे आ. सुरेश धस यांच्या प्रयत्नाने कडा कृषी उत्पन्न बाजार





समितीतनाफेड अंतर्गत महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशन यांचे सेवा सहकारी सोसायटी लि. जामगाव ता. आष्टी या शासकीय हमीभाव तूर खरेदीकेंद्रांस मंजुरी मिळाली आहे. या हमीभाव केंद्रात ७५५० प्रति क्विंटल दराने तूर खरेदी केली जाणार आहे. शेतकऱ्यांनी सातबारा व ८ अ मूळ प्रत, आधारकार्ड, बँक पासबुक (चालु खाते द्यावे, जनधन खाते देऊ नये) ऑनलाइन पिकपेरा नोंद असणे आवश्यक इत्यादी कागदपत्रासह प्रत्यक्ष येऊन नोंदणी करण्याचे आवाहन सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे. तसेच लवकरच प्रत्यक्ष खरेदी सुरू होणार असून शेतकऱ्यांनी कमी दराने तूरीची विक्री न करण्याचे आवाहन केले आहे.

# शेंद्रीय आणि रासायनिक शेतीचा समतोल राखा

## कृषी अधीक्षक सुभाष साळवे यांचे शेतकऱ्यांना आवाहन

परळी / प्रतिनिधी

रासायनिक खतांचा वापर वाढल्यामुळे शेतीचा पोत खराब होत असून भविष्यात त्याचे गंभीर परिणाम दिसू लागतील. हे टाळायचे असेल तर शेतकरी बांधवांनी शेंद्रीय आणि रासायनिक शेतीचा समतोल राखावा, असे आवाहन बीड जिल्हा कृषी अधीक्षक सुभाष साळवे यांनी केले. शेतकरी कीर्तन महोत्सवात 'शेतकरी योजना, शेती उद्योग आणि शेंद्रीय शेती' या विषयावर ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, रासायनिक खत, पवारण्या याच्या अती वापरामुळे शेतीमधील कीटकांची जीवन साखळी विस्कळीत झाली आहे. शेतीमध्ये काही जीव जंतू हे शेतीला लाभदायक असतात तर काही हानीकारक असतात. हानीकारक किकांना खाण्याचे काम काही किचकट करतात. त्यातूनच शेतीचा समतोल राखला जाती. कधी कधी हानीकारक असणाऱ्या कीटकांची संख्या वाढते तेव्हा किटक नाशक फवारणीचा पर्याय असतो. पण अलिकडे किती गरज आहे याचा विचार न करता भरमसाठ किटक नाशक फवारले जातात. परिणाम उपयुक्त आणि हानीकारक दोन्ही तऱ्हेचे किटक संपत आहेत. त्यातून नैसर्गिक जीवन साखळी विस्कळीत होत आहेत. म्हणून शेतकऱ्यांनी शेंद्रीय शेताचा पर्याय निवडला तर अधिक लाभ होऊ शकतो. रासायनिक खतांचा वापर टाळला तर कदाचित थोडे उत्पादन कमी होईल. पण त्याच वेळी खर्चही कमी होईल, असेही साळवे म्हणाले.




यावेळी त्यांच्या सोबत आलेल्या अधिकाऱ्यांनी विविध शासकीय योजनांची माहिती दिली. त्या योजनांचा लाभ घेण्यासाठीची सर्व प्रक्रियाही त्यांनी समजावून सांगितली... यावेळी जिल्हा कृषी अधिकारी, धारूर तालुका कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक यांच्यासह बीड कृषी विभागाचे अनेक अधिकारी उपस्थित होते.

खर्चात वाढ आणि उत्पन्नात घट झाल्याने शेतकरी अडचणीत

एकनाथ महाराज माने यांचे अनुभवाचे बोल

खत-बीयाऱ्याचे भाव दिवसेंदिवस वाढत आहेत. मजूर मिळत नाहीत. एकंदर शेतीचा खर्च वाढत आहेत. शेतमालाचे भाव मात्र त्या पटीत वाढत नाहीत. म्हणून शेतकरी अडचणीत आहे. मी स्वत: शेतकरी असल्याने हे सर्व अनुभवतो आहे, असे वांगी संस्थानचे अध्यक्ष ह. भ. प. एकनाथ महाराज माने यांनी सागितले. शेतकरी कीर्तन महोत्सवातून शेतकऱ्यांचे मनोबल वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शेतकरी कीर्तन महोत्सवाचे तिसरे कीर्तन पुष्प गुंफताना ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, वारकरी जेवढे आहेत तेवढे शेतकरी आहेत. संकटात असताना शेतकरी भजन - कीर्तनातून आपले दु:ख हलके करतात. तोच या कीर्तनातून होत आहे. गावातून येणाऱ्या भाकरी आणि त्याची होणारी सामोहिक पंगत ही जातीय सलोखा बळकट करणारे उपक्रम आहेत, असेही माने महाराज म्हणाले.

# ज्ञान प्रबोधिनी निवेदिता गट व नगरपालिका आंबेजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने घेतलेल्या

## प्लास्टीक संकलन स्पर्धेतील विजेत्याचा बक्षीस समारंभ

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

ज्ञान प्रबोधिनी निवेदिता गट व नगरपालिका अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्लास्टिक संकलन स्पर्धा प्रभाग ६ चा बक्षीस वितरण समारंभ योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या नागापूरकर सभागृहामध्ये पार पडला. आपल्या घरात येणारे प्लास्टिक स्वच्छ व कोरडे करून प्रत्येक महिन्याच्या २० तारखेला वर्षभर सातत्याने निवेदिता गटाकडे आणून द्यायचे होते. यासाठी स्पर्धेचा कालावधी २० नोव्हेंबर २०२३ ते २० ऑक्टोबर २०२४ असा होता. नियमितपणे, स्वच्छ व मोठ्या प्रमाणात संकलन करणाऱ्या गृहिणींची बक्षीसासाठी निवड करण्यात आली. हे गोळा झालेले प्लास्टिक रिसायकलिंग ला पाठवण्यात आले. या प्लास्टिक संकलन बक्षीस वितरण समारंभाच्या अध्यक्ष स्थानी नगरपालिकेच्या मुख्याधिकारी मा. प्रियंका टोंगे होत्या. स्वच्छता निरीक्षक मा.अनंत वेडे आणि प्रमुख पाहुणे समाजसेवक मा. नंदकिशोरजी मुंदडा तसेच माजी नगरसेविका सविताताई लोमटे व संगीता ताई व्यवहारे यांची याप्रसंगी उपस्थिती होती. ज्ञान प्रबोधिनीचे प्रमुख तथा मार्गदर्शक प्रसाद दादा चिक्षे यांनी या उपक्रमासाठी या गटाचे कौतुक केले. नंदकिशोरजी मुंदडा म्हणाले की, आपले हे जमा केलेले प्लास्टिक सध्या जरी रिसायकलसाठी लातूरला पाठवावे लागते असले तरी भविष्यात असे युनिट आपल्या अंबाजोगाई मध्ये नगरपालिकेने कार्यरत करावे. यावर आपल्या अध्यक्षीय समारोपात नगरपालिकेच्या मुख्याधिकारी प्रियंका टोंगे यांनी अशा युनिट साठी आवश्यक गोष्टींची पूर्तता करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. तसेच आपापल्या घरातील कचरा सुका व ओला वेगळा जमा करून घंटागाडीत टाकावा असे आवाहन उपस्थित महिलांना केले. या उपक्रमात आलेल्या अनुभवांबद्दल प्लास्टिक रिसायकल गटातर्फे विशेष परिश्रम घेत दीपाली माहुरकर यांनी प्रास्ताविकात माहिती दिली. या उपक्रमामध्ये नगरपालिकेचे वेळोवेळी सहकार्य मिळाले. ज्ञान प्रबोधिनी प्रमुख तथा मार्गदर्शक प्रसाद चिक्षे यांनी निवेदिता गटामार्फत होणाऱ्या 'ओळख स्पर्शाची' उपक्रमाद्वारे ७००० विद्यार्थ्यांना गुड टच बॅड टच ची माहिती ,भटक्या वस्तीवरील लोकांसाठी तसेच मुलांसाठी दिलेले योगदान,कोविड काळातील मदतकार्य अशा इतरही उपक्रमांबाबत माहिती दिली. माजी नगरसेविका सविता ताई लोमटे यांनी हातांना प्लास्टिक गोळा करण्याची सवय लागली की तो एक संस्कार बनतो व हाच अनुभव आपल्या विद्यार्थ्यांमध्येही रुजवता आला असे व्यक्त केले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक अमृता चिक्षे, द्वितीय जयश्री दहिफळे, तृतीय सविता कराड तसेच प्रभाग ६. मधील उत्तेजनार्थ सौ.अंजना शिंदे प्रभाग ६ व्यतिरिक्त पार्वती धाकतोंडे- उत्तेजनार्थ मुक्ता बागवाले - उत्तेजनार्थ तोंडारे सर - उत्तेजनार्थ या विजयी स्पर्धकांसोबत ९४ महिलांना प्रोत्साहन पर प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.सारिका बुरगे व मनीषा वालेकर यांनी केले. आभार प्रदर्शन तिलोत्तमा पतकराव यांनी केले. या गटाने त्यांच्या विविध उपक्रमातून आतापर्यंत ३५०० किलो प्लास्टिक लातूर या ठिकाणी रिसायकलिंग साठी पाठवले आहे. हे अभियान स्पर्धेपुरते मर्यादित न राहता अविरत सुरू राहील असेही या गटाने या कार्यक्रम निमित्याने प्रतिपादन केले.अंबाजोगाईमधील शाळांमध्ये देखील गटाच्या वतीने प्लास्टिक संकलन स्पर्धा घेतली जात आहे. यावेळी डॉ. शुभदा लोहिया, निवेदिता गटाच्या डॉ.सीमा लोमटे डॉ. नयन लोमटे, डॉ.प्रिया मुळे, स्मिता जोशी, रूपाली मुकादम, संगीता कराड, डॉ. कल्पना मुळावकर, डॉ. गौरी कुलकर्णी उपस्थित होत्या. प्रभाग ६ मधील व इतर प्लास्टिक कमी करण्यासाठी जागरूक असलेल्या भगिनी मोठ्या संख्येने होत्या.




## धारूर तालुक्यातील नागरिकांची रेशन केवायसी तात्काळ करून घ्यावी - ना.त.काकडे

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील ज्या नागरिकांची रेशनची ईकेवायसी करण्याची राहिली असेल, त्यांनी ३० मार्च पुर्वी केवायसी करून, आपले हक्काचे रेशन कायम ठेवावे.असे आवाहन धारूर तहसीलचे नायब तहसीलदार नारायण काकडे यांनी तेलगाव आयोजित ईकेवायसी कॅम्पस प्रसंगी बोलताना केले. नागरिकांना स्वस्त धान्य दुकानातून मिळत असलेल्या धान्य व्यवस्थित वितरित होते की नाही.लाभार्थी प्रत्येक नागरिकांना लाभ मिळतो का.यासाठी शासनाने प्रत्येक लाभार्थ्याचे रेशन ईकेवायसी करण्याचा निर्णय घेत गेल्या कांही महिन्यांपासुन ईकेवायसी केली जात आहे.जे लाभार्थी केवायसी करणार नाहीत त्यांना रेशन धान्य पासुन वंचित राहावे लागणार आहे.धारूर तालुक्यातील सर्व नागरिकांनी रेशन ईकेवायसी व्हावी.यासाठी तहसीलच्या पुरवठा विभागाकडून प्रयत्न केले जात असुन, यासाठी धारूर तहसील पुरवठा विभागाच्या वतीने तालुक्यात ठिकठिकाणी रेशन लाभार्थी केवायसी कॅम्पसचे आयोजन करून रेशन कार्ड धारकांची केवायसी करून घेतली जात आहे.तेलगाव ता.धारूर येथे दि.११ मार्च रोजी रेशन कार्ड धारकांसाठी ईकेवायसी कॅम्प घेण्यात आला.यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना नायब तहसीलदार नारायण काकडे म्हणाले की,रेशनचे धान्य लाभार्थ्या पर्यंत पोहच होण्यासाठी ही केवायसी करण्यात येत असुन, प्रत्येक लाभार्थ्यांनी ती करणे गरजेचे आहे.जे लाभार्थी केवायसी करून घेणार नाहीत त्यांना रेशन धान्य मिळणार नाही.त्यामुळे प्रत्येक लाभार्थ्यांनी तात्काळ आपली केवायसी करून घेत आपले. हक्काचे रेशन कायम ठेवावे.असे आवाहन काकडे यांनी केले.या कार्यक्रमास पुरवठा विभागाचे मिथुन गायसमुद्रे, अमिर शेख यांच्या तेलगाव येथील रेशन दुकानदार आर.एस.लगड, बोबडे, कृष्णा लगड आदिसह नागरिक उपस्थित होते.




### सी एस डॉ.अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा ग्रामीण रुग्णालयात

## डॉ जाधव व डॉ ओमासे यांच्या तज्ञ डॉक्टरांच्या टीमने सर्व रोग निदान व शस्त्रक्रिया शिबिर यशस्वी रित्या संपन्न

पाटोदा ।प्रतिनिधी

केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकार यांच्या माध्यमातून राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभाग,महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य विभाग बीड सी एस डॉ अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा ग्रामीण रुग्णालयात प्रत्येक महिन्याच्या मंगळवारी बुधवारी सर्व रोग निदान व शस्त्रक्रिया शिबीराचा आयोजन करण्यात येते

सदर शिबिरात ग्रामीण रुग्णालय पाटोदा येथील डॉक्टर अभिषेक जाधव व एम एस सर्जन,डॉक्टर शुभांगी ओमासे भूलतज्ञ याच्यासह ग्रामीण रुग्णालयातील टीम चांगल्या प्रकारे रुग्णांची सेवा करतात श्रीमती किशोरी डोरले,नागरे प्रियंका,आसमा मुजावर, सिस्टर व कर्मचारी सानप अर्जुन,सुनील लाड, देवराव राख,पवार सोपान, इत्यादी कर्मचाऱ्यांसह पाटोदा ग्रामीण रुग्णालयातील सर्व कर्मचारी रुग्णांना चांगली सेवा उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करतात तसेच पाटोदा तालुक्यातील रुग्णांनी कुटुंब नियोजन, साधे दुखी, हर्निया, अपेनडिक्स,मुतखडा,व इतर शस्त्रक्रियेसाठी बाहेर न जाता कोणत्याही महिन्यातील पहिल्या मंगळवार व बुधवारी आपल्या पाटोदा ग्रामीण रुग्णालयात शस्त्रक्रिया केली जात असल्याने ग्रामीण रुग्णालयाला संपर्क साधीत जावा



## सात वर्षीय सय्यद अरशीन चा आयुष्यातील पहिला रोजा

पाटोदा ।प्रतिनिधी

मुस्लिम समाजाचा पवित्र रमाजान महिना या वर्षी मार्च महिन्यात आला राज्यात उन्हाची तिव्रता वाढली आहे या उष्ण वातावरणात पिण्याच्या पाणी साठी घश्याला कोरड पडुलागली तरीही मुस्लिम समाजातील नागरीक व लहान मोठी मुले अन्न पाण्याचा त्याग करुन मानवतेच्या सुखासाठी दिवसभर ईश्वराप्रति उपवास करुन अल्लाहचे कृतज्ञता व्यक्त करतात. पाटोदा येथील जेष्ठ समाजवादी नेते दलितमित्र कॉ इकबाल पेटर यांचे जेष्ठ चिरंजीव विश्वास खतीब याची नात अरशिन इमरान वय ७ वर्ष या चिमकुलीने आयुष्यातील पहीला (उपवास) रोजा उत्साहात पुर्ण केला.

पाटोदा शहरातील क्रांतीनंतर गुलजारपुरा मस्जिद येथे कॉ इकबाल पेटर कुटूंबीयाच्या वतीने (उपवासक) रोजदार भक्तांना सामुदायिक इफ्तार व जेवनाचे आयोजन केले होते या कार्यक्रमास क्रांतीनंतर भागातील व पाटोदा शहरातील मान्यवरांनी उपस्थित राहून उपवासक अरशीनला शुभेच्छा देऊन कौतुक व पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले म्हणून सर्व हिंदू मुस्लिम बांधवाचे सय्यद परिवाराच्या वतीने इमरान सय्यद यांनी आभार व्यक्त केले आहे



# बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचा समारोप मौजे कासारी येथे संपन्न

## निबंध,रांगोळी,भित्ती पत्रक स्पर्धेतील विजेत्यांचा झाला गौरव

**केज/प्रतिनिधी**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था संचलित, बाबुरावजी आडसकर महाविद्यालय,केज यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या वार्षिक विशेष शिबिराचेआयोजन मौजे कासारी या.केजयेथे दि.६ मार्च ते १२ मार्च २०२५ या कालावधीत करण्यात आले होते. विशेष शिबिराचा समारोप दि.१२मार्च २०२५ रोजी उत्साहात झाला. समारोपाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अनिल किर्दंत हे होते.अध्यक्षीय भाषणात त्यांनीयुवकांच्या जबाबदारीवर भर देत असे मत व्यक्त केले की, आजचा युवा हा उद्याचा भारत आहे आणि त्याने डिजिटल साक्षर असणे ही काळाची गरज आहे.** तंत्रज्ञानाच्या युगात तरुणांनी डिजिटल साधनांचा योग्य वापर करून समाजहितसाधावे. व्यासपीठावर क्रांतिवीर आत्माराम बापू पाटील माध्यमिक विद्यालय, कासारी या शाळेचे मुख्याध्यापक मा.श्री. चोले व्हि.डी.डॉ.छत्रभुज इंगळे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.डॉ. इंगळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या या सामाजिक



कार्याची प्रशंसा केली आणि विद्यार्थ्यांनी यातून समाजसेवेची प्रेरणाघ्यावी असे आवाहन केले.या शिबिरात स्वयंसेवकां साठी विविध समाजोपयोगी उपक्रम यामध्ये ग्रामस्वच्छता मोहीम,वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिरे, डिजिटल साक्षरता कार्यशाळा,स्वच्छता जनजागृती रॅली आणि व्यक्तिमत्व विकास सत्रे यांचा समावेश होता.


स्वच्छता अभियानात चिंचपुर मारुती देवस्थान चा परिसर स्वच्छ केला. विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना वाव मिळावा म्हणून भित्तीपत्रके,निबंध व रांगोळी स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. यादव जे.बी.यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.क्षीरसागर पी.बी. यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रसिद्धी विभागाचे डॉ.बी.जे.हिरवे यांनी केले

या विशेष शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. जे.बी.यादव,प्रा.डॉ.बोबडे ए.आर,डॉ.शाम सरसरे, डॉ.टी.एस.बिडवे,डॉ. सुधीर आगळे,डॉ.प्रमोद काळम,युवराज डोईफोडे यांनी विशेष मेहनत घेतली महाविद्यालयातील शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी शिबिर यशस्वी केले

# वाहिरा येथील जि.प. प्रा.शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील वाहिरा येथील जि. प. प्रा. या शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम दि. १० मार्च रोजी उत्साहात पार पडले. वार्षिक स्नेहसंमेलनाची सुरवात संत शिरोमणी शेख महमद महाराज यांच्या आरतिने झाली. इंग्रजी - मराठी एकांकिका, गीतगायन, पारंपारिक नृत्य, कोळीगीते, देशभक्तिपर गीते, शेतकरी गीते, लावणी, रीमिक्स गाणे, नाटिका, छत्रपती शिवाजी महाराजांची गीते, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे गीत इत्यादी गीत प्रकार विद्यार्थ्यांनी जल्लोषात सादर केली.



वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक आनंदाचा क्षण असतो. या माध्यमातून त्यांच्या कलागुणांचा गौरव शिक्षण संस्थेकडून केला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाला व कौशल्याला वाव मिळतो. नेतृत्व गुण केवळ राजकीय क्षेत्रातच उपयोगी पडतात असे नाही, तर व्यावसायिक, शैक्षणिक क्षेत्रांतही त्यांचा चांगला उपयोग होतो असे मत लंबाते यांनी यावेळी व्यक्त केले. याप्रसंगी वाहिरा गावचे सरपंच, उपसरपंच, सेवा सोसायटी चेअरमन, ग्रामपंचायत मेंबर व विविध क्षेत्रातील अधिकारी मान्यवर, पंचक्रोशीतून बहुसंख्य समाज उपस्थित होता.

यावेळी या स्नेहसंमेलनाला बक्षिसांचा वर्षाव केला व विद्यार्थ्यांचे कौतुक केले तसेच मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंदाचे भरभरून कौतुक केले. या सर्व शिक्षकांनी मिळून अतिशय सुंदर, मेहनतीने, कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच कौतुक म्हणून १ लाख ८० हजार रुपयांचे बक्षीस जमा झाले.

# साबला गाव पाणीदार करण्यासाठी एआरटी संस्था यवतमाळ यांनी घेतला पुढाकार

केज/प्रतिनिधी

केजतालुक्यातील साबला गाव हे नेहमी कोणत्यान कोणत्या कारणाने चर्चेत असते.त्यात आतासाबला या गावात भर पडली ती म्हणजे पाणी टंचाईची बऱ्याच वर्षापासून या गावाला पाणी टंचाईचा सामना करावा लागतो. याची दखल ही जिल्हा यवतमाळयेथील एआरटी क्शन रुरल टॅक्नॉलॉजी संस्था यवतमाळ या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री.सुहासराव धस,जल संधारण तज्ञ पवनराव नखाते,प्रकल्प व्यवस्थापक वलीतांबोळी प्रकल्प सहाय्यक श्रीमती ज्योतीताई सांबरे यांनी पुढाकार घेऊन केज तालुक्यातील साबला हे गाव दत्तक घेतले आहे. आणि या गावाला टॅकर मुक्त करण्यासाठी या गावाची निवड केली आहे साबला या गावाच्या परिसरातील लहान ओढे, नाले,नद्या यातील गाळ काढून त्याचे रूंदीकरण करणे,त्यामध्ये पाणी अडवण्यासाठी बॉक्स बनवणे,पाऊस पडल्या नंतर पावसाचे पाणी जमिनीत मुरले पाहिजे म्हणजे यानंतरच्या पुढील काळात या गावातील नागरिकांना तसेच पशु, पक्षी,प्राणी यांनापाण्याची कसलीही अडचण येणार नाही.यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.




या कामाचा शुभारंभ उप सरपंच श्रीमती कचराबाई सरवदे,समाजसेवक, आदर्श शिक्षक श्री.नरहरी काकडे,ग्रामपंचायत अधिकारी श्री.धनराज सोनवणे,चेअरमन उत्तम राव काकडे,माजी सरपंच मधुकर काकडे,माजी सरपंच महादेव कटारे, ग्रामरोजगार सेवक दत्तकुमार काकडे,ग्राम पंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ,पोपट काकडे, मेजर बबनराव मुळे,माजी ग्रामपंचायत सदस्य रामराजे शिंदे,श्रीमंत नाईकनवरे,आश्रुबा काकडे,सेवा सहकारी सोसायटी संचालक सदाशिव काकडे तसेच बाबुराव काझी,पवन सरवदे,जालींदर मुळे, अनिल भोसले,संजिवन नाईकनवरे,सुदामराव राऊत,रामभाऊ काकडे, गोरख काकडे,बप्पा काकडे,तात्याराम मुळे, विश्वनाथ नाईकनवरे, उत्तमभाऊ काकडे, राजेभाऊ काकडे,विलास काकडे,जगन्नाथ काकडे, सुभाषराव काकडे,गुलाब मुळे,राम काकडे, सावताराम नाईकनवरे, सुदामराव नाईकनवरे इत्यादी गावकऱ्यांच्या उपस्थितीत या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात छ.संभाजी महाराज बलिदान दिन व महाराजा सयाजीराव गायकवाड जयंती आणि यशवंतराव चव्हाणजयंती संपन्न

केज/ प्रतिनिधी

स्वानंद सार्वजानिक वाचनालय,आनंदगांव ता. केज जि.बीड येथे दिनांक ११ मार्च २०२५ रोजी छ. संभाजी महाराजबलिदान दिन व महाराजा सयाजीराव गायकवाड जयंती अत्यंत साधेपणाने साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक प्राचार्य डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.प्रमुख अतिथी म्हणून महेश गायकवाड, बाळासाहेब गायकवाड यांची उपस्थिती होती.सर्वप्रथम महेशगायकवाड व बाळासाहेब गायकवाड यांच्या हस्ते छ.संभाजी महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.दिनांक १२ मार्च २०२५ रोजी जेष्ठ स्वातंत्र्यसेनानी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती अत्यंत साधेपणानेसाजरी करण्यात आली.अध्यक्ष स्थानी डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणूनमाजी सरपंच रामराजे गायकवाड,बबन पुंड, रावसाहेब गायकवाड यांची उपस्थिती होती.



सर्वप्रथम यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पुजन पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. रामराजे गायकवाड,बबन पुंड,रावसाहेब गायकवाड यांच्या हस्ते पुजन करण्यात आले.दोन्ही दिवशी वेगवेगळ्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन,आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

# ह.भ.प.महंत महादेव महाराज बोराडे शास्त्रींनी त्यागाच्या बळावर माळरानावर भक्तीचा मळा फुलविला.-योगी निरंजननाथ महाराज

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील श्रीक्षेत्र संत तुकोबारायपावनधाम संस्थान येथे संत तुकाराम महाराज बीजोत्सवाच्या सोहळ्यात तिसऱ्या दिवशी ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदीचे प्रमुख विश्वस्त,योगी निरंजननाथ महाराज यांची प्रवचन सेवा संपन्न झाली.यावेळी उपस्थित भाविकांना ज्ञानामृत वाटताना योगी निरंजन नाथ महाराज म्हणाले की,बोराडे शास्त्रींनी त्यागाच्या बळावर देहूचे तुकोबा माळरानावर आणून भक्तीचा मळा फुलविला आहे.प्रवचनात पुढे बोलताना ते म्हणाले की,समाधान,सुख हे फक्त पांडुरंगाच्या भक्तीत आहे. माऊलींनी दिलेला 'रामकृष्ण हरी' हा मंत्र जपत रहा,आयुष्यात कांही कमी पडणार नाही. ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदीचे प्रमुख विश्वस्त,योगी निरंजननाथ महाराज यांचे प्रवचन ऐकण्यासाठी शेकडो भाविक संत तुकोबाराय पावनधाम संस्थान येथे आले होते.आलेल्या भाविकांची गैरसोयहोणार नाही याची काळजी संत तुकोबाराय पावनधाम




संस्थानचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या मार्गदर्शना खाली स्वयंसेवकांनी घेतली आहे.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणातील पहिली सुनावणी संपली:पुढील सुनावणी २६ तारखेला

## उज्वल निकम गैरहजर तर वाल्मीक कराडांनी वकील बदलला

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आज पहिली सुनावणी होणार आहे. राज्य भर चर्चेचा विषय ठरणाऱ्या या प्रकरणात आरोपींना मकोका कायदा अंतर्गत अटक करण्यात आली आहे. तसेच वाल्मीक कराडवर खंडणीसह इतर अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यामुळे या प्रकरणाच्या सुनावणीकडे आता राज्याचे लक्ष होते. अखेर आजची सुनावणी संपली असून आता पुढील सुनावणी २६ तारखेला होणार आहे.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराड यांच्याशी असलेल्या संबंधावरून धनंजय मुंडे यांना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. या प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र या प्रकरणात उज्वल निकम आज न्यायालयात हजर राहिले नाही. दुसरीकडे वाल्मिक कराडने आपला वकील बदलला असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच या प्रकरणातील सर्व आरोपींना व्हीसीद्वारे न्यायालयात हजर केले गेले.

दरम्यान पहिल्या सुनावणीच्या वेळी संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपीच्या वकिलांनी दोषारोपपत्रात नसलेली महत्त्वाची माहिती मागितली आहे. दोषारोप पत्र सादर करताना त्यामध्ये साक्षीदारांचे जबाब आणि आरोपीचे जबाब तसेच फोन कॉल्स संदर्भातील माहिती नव्हती. ती सर्व माहिती आरोपीच्या वकिलांनी आज न्यायालयात मागितली आहे. तसेच सगळ्या फोन कॉलचे सीडीआर देखील मागितले आहेत.२८ ऑगस्ट २०२४ रोजी वाल्मीकने पहिल्यांदा फोन करून खंडणी मागितली. परळीत येऊन भेटा, नाहीतर काम बंद करा, अशी धमकी दिली. ११ सप्टेंबर २०२४ रोजी दुसऱ्यांदा फोन करून बीड





### कंपनीचे प्रकल्प अधिकारी सुनील शिंदे यांचा सीआयडीला जबाब

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मीक कराडने अवादा कंपनीकडून एकदा नव्हे, तर तब्बल ६ वेळा खंडणी मागितल्याचे समोर आले आहे. केज तालुक्यातील मस्साजोग येथील कंपनीचे प्रकल्प अधिकारी सुनील शिंदे यांनी सीआयडीला दिलेल्या जबाबात याचा उल्लेख केला आहे.

जिल्ह्यातील सुरू असलेल्या कामांची माहिती घेतली. वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटायला आणा, असे सांगितले. ८ ऑक्टोबर २०२४ रोजी परळीतील जगमित्र कार्यालयात वाल्मीक, विष्णू चाटे आणि शिवाजी थोपटे यांची भेट झाली. प्लांट सुरू ठेवायचा असेल, तर दोन कोटी रुपये द्या. नाहीतर जिल्ह्यात कुठेही प्लांट चालू ठेवू देणार नाही, अशी धमकी दिली. नंतर २६ नोव्हेंबर २०२४ रोजी चौथ्यांदा आरोपी सुदर्शन घुले कंपनीत आला. दोन कोटी रुपये दिले नाही, तर बीड जिल्ह्यात कुठेही काम करू देणार नाही, असे म्हणत धमकी दिली. २९ नोव्हेंबर २०२४ रोजी विष्णू चाटेने सकाळी ११:३० वाजता फोन केला. वाल्मीकने काम बंद करण्याचा इशारा दिला. त्याच दिवशी संध्याकाळी सुदर्शन घुले कंपनी ऑफिसमध्ये आला. वाल्मीक अण्णांची मागणी लवकर पूर्ण करा, असे धमकावले असल्याचे अधिकाऱ्यांनी आपल्या जबाबत सांगितले आहे.